## प्रो-गोविंदा लीग सीझन ४चे शानदार उद्घाटन

**मुंबई** : वरळी डोम येथे आयोजित प्रो-गोविंदा लीग सीझन ४चे उद्घाटन मंगळवारी (दि.२५) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी महाराष्ट्राची संस्कृती आणि मुंबईची खास ओळख असलेल्या दहीहंडी या साहसी खेळाचा आगामी काळात एशियाड, कॉमनवेल्थ आणि ऑलिम्पिकपर्यंत समावेश करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, पूर्वेश सरनाईक, महापौर रितू तावडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने गोविंदा पथके उपस्थित होती. यापूर्वीच राज्य सरकारने दहीहंडीला साहसी खेळाचा दर्जा दिला आहे. आता हा खेळ जागतिक स्तरावर नेण्यासाठी अखिल भारतीय ऑलिम्पिक असोसिएशन व इतर संबंधित संघटनांची मान्यता मिळवणे गरजेचे असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी या खेळाला ऑलिम्पिकपर्यंत पोहचवण्यासाठी सहकार्य करू, असे सांगितले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ४०
www.ramprahar.com

◆ बुधवार, २६ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


गोळीबार करून फरार झालेल्या आरोपीला अटक/२

रोह्यात गावठी दारू अड्ड्यांवर कारवाई/५

मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत उरणच्या खेळाडूंची चमक/८


# शेतकऱ्यांना वर्षभर १२ तास मोफत वीज

### मुख्यमंत्र्यांची घोषणा; ५८ हजार कोटींची थकीत देयकेही माफ

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**



राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी, थकीत वीजबिले माफ करण्यात आल्याने दिलेला शब्द राज्य सरकारने पूर्ण केला. सध्या ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीज मिळत आहे. भविष्यात ३६५ दिवस शेतकऱ्यांना १२ तास मोफत वीज देण्याची व शेतकऱ्यांची ५८ हजार कोटी रुपयांची थकीत वीजबिले माफ करण्याचा निर्णयही राज्य सरकारने घेतल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.२५) केली.

गंगागिरी महाराज यांच्या १७९व्या अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार विठ्ठलराव लंघे, अमोल खताळ, आशुतोष काळे, विवेक कोल्हे, रमेश बोरनारे, महंत रामगिरी महाराज आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने शेतकऱ्यांना दिलेला कर्जमाफीचा शब्द पूर्ण करत १२.५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये आतापर्यंत कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा उपक्रम सुरू आहे. दर १५ दिवसांनी नवीन पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जात आहे.

आमच्या पाठीशी सनातन व आध्यात्मिक शक्ती उभी असल्याने आम्हाला राज्यात विजय मिळाला, असा दावा करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संतांच्या विचारांवर आघात करणाऱ्या किंवा त्यांना धमक्या देणाऱ्यांची गय केली जाणार नाही. जर कोणी धमकी देण्याचे कृत्य केले, तर त्याला थेट नेस्तनाबूत करून टाकू. कोणाच्याही केसाला धक्का लागू देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

## अभियंता प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेश प्रभारीपदी आमदार प्रशांत ठाकूर

### भाजपच्या संघटनात्मक विस्तारात नवी जबाबदारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस तथा पनवेल विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांची पक्षाच्या अभियंता प्रकोष्ठ प्रदेश प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आल्याने पनवेलसह रायगड जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या विविध प्रकोष्ठांची पुनर्रचना करण्यात आली असून त्याअंतर्गत आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर अभियंता प्रकोष्ठची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. अभियंता, तांत्रिक क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच व्यावसायिकांना पक्षाच्या विचारांशी जोडण्यासाठी आणि त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग समाजहिताच्या विविध उपक्रमांसाठी करण्याच्या दृष्टीने या प्रकोष्ठची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल विधानसभा मतदारसंघासह रायगड जिल्ह्यात पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने काम केले आहे. संघटनात्मक कौशल्य, कार्यकर्त्यांशी असलेला सातत्यपूर्ण संपर्क आणि विकासकामांचा व्यापक अनुभव असल्यामुळे त्यांना आधी प्रदेश चिटणीस आणि आता अभियंता प्रकोष्ठच्या प्रदेश प्रभारीपदी जबाबदारी सोपविण्यात आली. **(पान २ वर..)**

## मुंबईत गणपती मिरवणुकीवर अंडी फेकणारा युवक गजाआड

**मुंबई : प्रतिनिधी**

माझगाव परिसरात गणपती आगमनाच्या मिरवणुकीवर एका इमारतीवरून अंडी फेकण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी ३६ तासांत आरोपीला अटक केली आहे. दानिश शेर खान असे या आरोपीचे नाव असून तो २२ वर्षांचा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आरोपी दानिश हा ऑनलाइन ऑर्डर घेऊन परिसरामध्ये अंडी घरपोच देण्याचा व्यवसाय करतो. घटनेच्या दिवशी नेहमीप्रमाणे तो अंडी पोहचवण्यासाठी रामभाऊ भोगले मार्गावरून इमारतीत प्रवेश करीत असताना मिरवणुकीदरम्यान वाजवण्यात आलेल्या फटाक्यांच्या धुरामुळे त्याला त्रास झाला. त्याचाच राग मनात धरून दानिशने हे कृत्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.

या घटनेने परिसरात तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी पाच पथके तयार करून स्थानिक परिसर आणि इतरत्र आरोपीचा शोध घेतला. तांत्रिक तपास करून उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आरोपीची ओळख पटवण्यात आली. त्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पोलिसांनी आरोपी दानिशला अटक केली. त्याच्यावर भायखळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

## आदिवासी शाळांमधील गैरकारभारासाठी काँग्रेस नेतेच जबाबदार!

### राहुल गांधींच्या पत्रावर भाजपचा पलटवार

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्राला महाराष्ट्र भाजपने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधी यांच्याकडून अभ्यासपूर्ण किंवा निष्पक्ष भूमिकेची अपेक्षा नसली तरी महाराष्ट्रातील जनतेसमोर काही सत्य आकडेवारी आणि वास्तव मांडणे गरजेचे असल्याचे सांगत भाजपने काँग्रेसवर गंभीर आरोप केले आहेत.



विद्यार्थ्यांच्या ज्या आंदोलनांचा संदर्भ राहुल गांधींनी पत्रात दिला आहे, त्या आदिवासी शाळा प्रत्यक्षात काँग्रेस नेत्यांकडूनच चालवल्या जात आहेत, असा दावा भाजपने केला आहे. काही दिवसांपूर्वी ज्या शाळेत तीन तरुणींचा सर्पदंशाने मृत्यू झाला, त्या शाळेचे संचालक माजी काँग्रेस खासदार मारोतराव कोवासे हे आहेत, तर त्यांचे सुपुत्र आणि गडचिरोली जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष विश्वजित कोवासे हे या शाळेचे सचिव आहेत, अशी माहिती भाजपने दिली. याचबरोबर यवतमाळमधील चिंधुजी लक्ष्मणराव पुरके आश्रमशाळेच्या तपासणीदरम्यान मुलींच्या स्वच्छतागृहांना दारेच नसल्याचे उघडकीस आले होते आणि ही शाळा माजी मंत्री तथा काँग्रेस नेते वसंत पुरके यांच्या माध्यमातून चालवली जाते, असेही पत्रात म्हटले आहे.

काँग्रेस सत्तेत असताना या शाळांवर चुकीच्या पद्धतीने ताबा मिळवून त्यांचा गैरवापर करण्यात आला, असा आरोप भाजपने केला आहे. वर्षानुवर्षे आदिवासी समुदायाचे शोषण करणारेच लोक आता स्वतःला वाचवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या समस्यांमागे लपण्याचा प्रयत्न करीत आहेत. या काँग्रेस नेत्यांवर होणारी कारवाई रोखण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होणार नाही, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

### आधी तेलंगणा, कर्नाटकात सुधारणा करा!

आधी गैरप्रकार करायचे आणि नंतर त्यावर कारवाई झाल्यावर गोंधळ घालायचा हा काँग्रेसचा ठरलेला पॅटर्न जनतेला आता चांगल्या प्रकारे समजला आहे. ही नौटंकी थांबवून काँग्रेस नेत्यांना पाठीशी घालणे बंद करावे, असे सांगत महाराष्ट्र सरकार आदिवासी समाज आणि विद्यार्थ्यांच्या रक्षणासाठी पूर्णपणे सक्षम असल्याचे भाजपने स्पष्ट केले तसेच राहुल गांधींनी महाराष्ट्रावर बोलण्याआधी स्वतःची सत्ता असलेल्या तेलंगणा आणि कर्नाटक राज्यातील आदिवासी कल्याण विभाग व वसतिगृहांची दुरवस्था सुधारण्याकडे लक्ष द्यावे, असा उपरोधिक सल्लाही देण्यात आला आहे.

## निवडक

### तरुण तेजपालला शरण येण्याचे कोर्टाचे निर्देश

**नवी दिल्ली :** महिला सहकाऱ्यावरील लैंगिक अत्याचारप्रकरणी 'तहलका' मासिकाचा माजी मुख्य संपादक तरुण तेजपाल याला सर्वोच्च न्यायालयाने दोन आठवड्यांमध्ये न्यायालयात किंवा पोलिसांसमोर शरण येण्याचे निर्देश दिले आहेत. तेजपाल प्रत्यक्ष शरण येऊन तसे प्रमाणपत्र सादर करत नाही, तोपर्यंत शिक्षेविरोधातील याचिकेवर सुनावणी घेतली जाणार नाही, असेही कोर्टाने स्पष्ट केले आहे.

### रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठी शिकण्यासाठी नोटीस

**मुंबई** : रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठी भाषा शिकण्यासाठी एका महिन्याची नोटीस देण्यात येईल. त्यानंतरदेखील एखादा चालक व्यावहारिक मराठी शिकला नाही, तर त्याचा बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल, असे राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे. ते मंगळवारी (दि.२५) मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. **(सविस्तर पान २ वर..)**

## न्या. सुनील शुक्रे यांनी महाराष्ट्र लोकायुक्त अध्यक्षपदाची घेतली शपथ

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी मंगळवारी (दि.२५) राज्याच्या लोकायुक्त संस्थेच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली. लोकभवन मुंबई येथे झालेल्या एका छोटेखानी सोहळ्यात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी न्या. सुनील शुक्रे यांना पदाची शपथ दिली.



शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर, मावळते लोकायुक्त न्या. विद्यासागर कानडे, गोवा राज्याचे लोकायुक्त न्यायमूर्ती संदीप शिंदे, राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे, महाराष्ट्र लोकायुक्त संस्थेचे अन्य सदस्य तसेच मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.

न्या. शुक्रे यांची नियुक्ती २०२३च्या नव्या महाराष्ट्र लोकायुक्त कायद्यानुसार करण्यात आली असून ही नियुक्ती पाच वर्षांसाठी किंवा ते वयाची ७० वर्षे पूर्ण करेपर्यंत, यापैकी जे अगोदर असेल त्या दिवसापर्यंत असेल.

## पनवेलच्या वडाळे तलावाची महापौरांकडून पाहणी

### स्वच्छता आणि संवर्धनासाठी उचलली जाणार पावले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक वडाळे तलावाला सध्या जलपर्णीचा विळखा पडला असून तलावाच्या सौंदर्याला बाधा निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी मंगळवारी (दि.२५) वडाळे तलावाची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. तलावाच्या स्वच्छता आणि संवर्धनासाठी प्रशासन लवकरात लवकर ठोस पावले उचलेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

तलावाच्या पाहणीदरम्यान शिवसेनेचे नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी महापौरांना निवेदन सादर केले. वडाळे तलावातील जलपर्णीची समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी 'बायोरिमेडिएशन' ही अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक प्रक्रिया राबवण्यात यावी, अशी मागणी त्यांनी या निवेदनाद्वारे केली. या तंत्रज्ञानामुळे तलावातील पाण्याचे शुद्धिकरण होऊन तलावाला त्याचे मूळ सौंदर्य पुन्हा प्राप्त होईल, असा विश्वास सोमण यांनी व्यक्त केला. नगरसेवकांच्या निवेदनावर आणि नागरिकांचा आग्रह लक्षात घेता महापौर नितीन पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. वडाळे तलाव लवकरात लवकर जलपर्णीमुक्त आणि स्वच्छ व्हावा या दृष्टीने महापालिका प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही वेगाने केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

या पाहणी दौऱ्यावेळी महापालिकेचे स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेविका प्रीती जॉर्ज, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये यांच्यासह लोकप्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित होते.

## एक राखी सैनिकांसाठी...!

### पनवेल महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांची जवानांप्रति कृतज्ञता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**





रक्षाबंधनाचे औचित्य साधून देशाच्या सीमेवर अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांप्रति कृतज्ञता, आदर आणि स्नेह व्यक्त करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ५, जीवन शिक्षण विद्यामंदिर, मोठा खांदा येथे 'एक राखी सैनिकांसाठी' हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. विशेष म्हणजे या उपक्रमाचे यंदाचे हे सलग चौथे वर्ष आहे.

पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार शिक्षण विभाग उपायुक्त नानासाहेब कामठे, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला. शिक्षण विभाग अधीक्षक दीपक सिलकन, शिक्षक ज्ञानेश रामचंद्र आलदर यांच्या पुढाकारातून मागील चार वर्षांपासून शाळेत हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे.

या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी स्वतःच्या हाताने आकर्षक राख्या तयार केल्या. मुख्याध्यापिका शुभा आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुनीता बडे, अंजली देसाई, निलोफर शेख, देवांगना मुंबईकर आणि जयश्री खांडेकर या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना राख्या तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले.

### सलग चौथ्या वर्षी उपक्रम

*देशाच्या रक्षणासाठी कुटुंबापासून दूर राहून कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांप्रति विद्यार्थ्यांनी आपल्या हाताने तयार केलेल्या राख्यांच्या माध्यमातून आपला जिव्हाळा आणि कृतज्ञता व्यक्त केली. सैनिकांचे दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि सुख-समृद्धीसाठी विद्यार्थ्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देतानाच देशसेवा, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणारा हा उपक्रम शाळेत सलग चौथ्या वर्षीही उत्साहात पार पडला.*

**नांदेड हादरले**

## नातेवाइकाकडून बालिकेवर अत्याचार

**नांदेड : प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्याच्या लोहा तालुक्यातील सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत नातेवाइकाने तीन वर्षीय चिमुकलीला चॉकलेटचे आमिष दाखवून अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून फरार आरोपीचा कसून शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सोमवारी सायंकाळी पीडित बालिका घरासमोरील अंगणात खेळत होती. त्याचवेळी शेजारी राहणाऱ्या नातेवाईक व्यक्तीने तिला चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून सोबत नेले. साधारण २० ते २५ मिनिटांनंतर तो मुलीला पुन्हा घरी सोडून निघून गेला. मुलगी रडत असल्याचे तिच्या आईच्या लक्षात आले. त्यामुळे विचारपूस केली असता संबंधित व्यक्तीने तिच्यासोबत गैरकृत्य केल्याचे तिने सांगितले. विशेष म्हणजे चिमुकली त्याला 'बाबा' अशी हाक मारायची. घटनेनंतर आरोपी फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## ढोल-ताशा पथकांचा जोरदार सराव

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवाला अवघे तीन आठवडे शिल्लक असतानाच पनवेल शहरात उत्सवाची लगबग सुरू झाली आहे. गणेश मंडळांकडून सजावट, विद्युत रोषणाई, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मिरवणुकीच्या नियोजनाला वेग आला असून ढोल-ताशा पथकांच्या तालमींनाही जोर आला आहे.



पनवेल शहरातील विविध परिसरांत तरुण-तरुणींचे गट दररोज ढोल-ताशांच्या तालावर सराव करताना दिसत आहेत. मोकळी मैदाने, उड्डाणपुलांखालील जागा तसेच परिसरातील उपलब्ध मैदानांमध्ये ढोल, ताशा आणि झांजांच्या तालमी सुरू आहेत.

गणेशोत्सवातील आगमन आणि विसर्जन मिरवणुकीत उत्कृष्ट सादरीकरण करण्यासाठी पथकांकडून विशेष मेहनत घेतली जात आहे. यंदा काही मंडळांनी नवीन वाद्यसामग्रीही घेतली असून पारंपरिक ढोल-ताशांच्या तालासोबत विविध तालांचा मेळ साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. ताल, लय, वेग आणि एकसंघ वादन यावर विशेष भर दिला जात आहे.

### गणेशोत्सवाची तयारी

गणेश मंडळांकडून मिरवणुकीचे मार्ग, वाहनांची सजावट, विद्युत रोषणाई आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन सुरू झाले आहे. त्याचबरोबर ढोल-ताशा पथकांकडून अंतिम सादरीकरण अधिक प्रभावी करण्यासाठी नियमित सराव केला जात आहे. विविध भागांत ढोल-ताशांचा निनाद ऐकू येऊ लागल्याने गणेशोत्सवाची चाहूल लागली आहे.

# ‘रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देणे सुरूच राहणार’

## मराठी शिकण्यासाठी एक महिन्याची नोटीस; नकार दिल्यास कायद्यानुसार बॅज रद्द

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात रिक्षा व टॅक्सी चालविणाऱ्या अमराठी चालकांना प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या उद्देशाने परिवहन विभागाच्या सामाजिक बांधिलकीतून राबविलेल्या १०५ दिवसांच्या विशेष उपक्रमाद्वारे राज्यातील सुमारे १ लाख ६५ हजार ८०० रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. हा उपक्रम पुढेही सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी (दि.२५) पत्रकार परिषदेत दिली.



परिवहनमंत्री सरनाईक यांनी मंगळवारी मंत्रालयात पत्रकार परिषद घेतली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कामगार नेते शशांक राव तसेच कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण या उपक्रमाला रिक्षा-टॅक्सी चालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राची अस्मिता आणि संस्कृतीचा आदर राखण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

ज्या रिक्षा-टॅक्सी चालकांना अद्याप मराठी भाषेचे प्रशिक्षण घ्यायचे आहे, त्यांच्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघाच्या माध्यमातून कार्यशाळा सुरू ठेवण्यात येणार आहेत. मुंबई, ठाणे, भिवंडी, नालासोपारा, वसई-विरार आणि नवी मुंबई या भागांतील प्रशिक्षण केंद्रांची यादी संबंधित आरटीओ अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. प्रशिक्षण केंद्रांची माहिती मिळण्यासाठी आरटीओच्या माध्यमातून स्वतंत्र संपर्क क्रमांक लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

मराठी भाषा विभागांतर्गत राबविण्यात येणारे ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा अभियान’ सातत्याने पुढे सुरू ठेवण्याचे धोरण असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकण्यासाठी अतिरिक्त मुदत देण्याबाबत मंत्री सरनाईक म्हणाले की, संबंधित चालकांना एक महिन्याची नोटीस देण्यात येईल. त्यानंतरदेखील एखादा चालक व्यावहारिक मराठी शिकला नाही, तर त्याचा बॅच तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# कर्जतमध्ये ‘युरिया’ची टंचाई

## शेतकऱ्यांकडून खताच्या मागणीत वाढ

**कर्जत : प्रतिनिधी**

खरीप हंगामातील पिकांना खताची सर्वाधिक गरज असतानाच कर्जत तालुक्यात युरिया खताच्या उपलब्धतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. कृषी विभागाच्या अहवालानुसार तालुक्यात आतापर्यंत १,१३२.५६ मेट्रिक टन युरियाची आवक झाली असून त्यापैकी १,०८२.२६ मेट्रिक टन युरियाची विक्री झाल्याची नोंद आहे. त्यामुळे सध्या केवळ ५०.३० मेट्रिक टन युरियाचा साठा शिल्लक असून मागणी मात्र तब्बल ४०० मेट्रिक टन असल्याचे स्पष्ट झाले आहे. कागदोपत्री आवक - विक्रीचे मोठे आकडे असतानाही प्रत्यक्षात शेतकऱ्यांना युरिया मिळत नसल्याच्या तक्रारींमुळे खत वितरण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कर्जत तालुका कृषी अधिकारी राजेंद्र शिंदे यांच्याकडून प्राप्त अधिकृत माहितीनुसार, तालुक्यात युरियासह एन पी के एस आणि एस एस पी या खतांची मिळून १,४१३.५६ मेट्रिक टन आवक झाली आहे. त्यापैकी १,३२०.५४ मेट्रिक टन खताची विक्री झाल्याची नोंद असून ९३.०२ मेट्रिक टन साठा शिल्लक आहे. यामध्ये एन पी के एस चा ३०.६२ मेट्रिक टन आणि एस एस पी चा १२.१० मेट्रिक टन साठा आहे. या तिन्ही खतांची एकूण मागणी ४८० मेट्रिक टन असल्याचेही अहवालातून स्पष्ट होते.

कृषी विभागाच्या नोंदीनुसार २० एप्रिल ते १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत कर्जत तालुक्यातील विविध विक्रेते व संस्थांमार्फत युरियाच्या अनेक खेपा दाखल झाल्या. सुहास ॲग्रो ट्रेडर्स, कर्जत तालुका



एसकेव्हीएस, युगंधरा कृषी सेवा केंद्र, मोक्षदा ॲग्रो सेंटर, प्रचित ॲग्रो डेव्हलपर, समर्थ कृषी सेवा केंद्र यांच्यासह विविध विक्रेत्यांकडे युरियाचा पुरवठा करण्यात आल्याची नोंद आहे. २० एप्रिल रोजी सुहास ॲग्रो ट्रेडर्समार्फत २५.०२ मेट्रिक टन युरियाच्या पुरवठ्यापासून सुरू झालेल्या या नोंदी ऑगस्टपर्यंत आहेत. १६ ऑगस्ट रोजी प्रचित ॲग्रो डेव्हलपरमार्फत २५.०२ मेट्रिक टन युरियाची आवक झाल्याची शेवटची नोंद आहे. या सर्व नोंदींची एकत्रित आकडेवारी १,१३२.५६ मेट्रिक टन इतकी आहे.

शासकीय अहवालानुसार मोठ्या प्रमाणात युरियाची आवक आणि विक्री झाल्याचे दिसत असले, तरी प्रत्यक्षात अधिकृत कृषी विक्रेत्यांकडे खतासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना अनेकदा 'युरिया उपलब्ध नाही' असे उत्तर मिळत असल्याच्या तक्रारी आहेत. कर्जत शहरासह कशेळे, कडाव, नेरळ आणि तालुक्यातील इतर बाजारपेठांमध्ये शेतकरी युरिया खरेदीसाठी हेलपाटे मारत आहेत. मात्र अनेक ठिकाणी खत उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येत असल्याने शासकीय नोंदीतील विक्री आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांना मिळणारे खत याचा मेळ कसा घालायचा?असा प्रश्न उपस्थित होत आहे.

युरिया खत शेतकऱ्यांना अनुदानित दरात उपलब्ध करून देण्याची शासनाची व्यवस्था आहे. मात्र युरियाला शेतीबाहेरील वापरासाठीही मागणी असल्याने तसेच अनुदानित आणि बाजारातील किंमतीत तफावत असल्याने त्याच्या वितरणावर अधिक काटेकोर नियंत्रणाची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. कर्जत तालुक्यात शेतकऱ्यांना प्रत्यक्षात युरिया मिळत नसल्याच्या तक्रारी आणि दुसरीकडे मोठ्या प्रमाणातील आवक-विक्रीची शासकीय आकडेवारी यामुळे खत वितरण व्यवस्थेत नेमके कुठे अडथळे निर्माण होत आहेत? हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

> **तालुक्यात युरिया खताची कमतरता असताना अनुदानित दरातील युरियाची एक बॅग मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जत, कशेळे, कडाव, नेरळ आदी बाजारपेठांमध्ये हेलपाटे मारावे लागत आहेत. या फेऱ्यांमध्ये वेळ आणि प्रवासाचा खर्च होत असून, अनेकदा हेलपाटे मारूनही खताची बॅग मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक पदरमोड होत आहे. तालुक्यातील अशा पीडित शेतकऱ्यांशी संपर्क करून युरिया खताच्या तुटवड्याबाबत वस्तुस्थिती जाणून घेतली जाईल आणि संबंधित विभागाकडे चौकशीची मागणी करण्यात येईल.**
> **-अंकुश शेळके,**
> शेतकरी तथा उपाध्यक्ष,
> शेतकरी सल्ला समिती, कर्जत

# रायगड जिल्हा नियोजन समिती गठन करण्यासाठी प्रशासकीय हालचालींना वेग

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडच्या पालकमंत्री पदाचा तिढा सुटल्यानंतर आता, जिल्हा नियोजन समितीच्या गठन प्रक्रीयेला सुरवात होणार आहे. त्यासाठी प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. महिनाभरात ही प्रक्रीया पूर्ण केली जाणार असल्याची माहिती जिल्हा नियोजन विभागाने दिली आहे.

डिसेंबर महिन्यात जिल्ह्यातील दहा नगर पालिकांसाठी निवडणुका पार पडल्या होत्या. त्यानंतर पनवेल महापालिका आणि फेब्रुवारी-मार्चमध्ये जिल्हा परिषद निवडणूक पार पडली होती. जिल्हा परिषद, महापालिका आणि नगर परिषदेवर सत्ता स्थापन झाल्या. साडे तीन चार वर्षांची प्रशासकीय राजवट संपुष्टात आली.

लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सत्तेवर आले, मात्र स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका होऊनही जिल्हा नियोजन समितीचे गठन होऊ शकलेले नव्हते. जिल्ह्याचा पालकमंत्रिपदाची तिढा सुटत नसल्याने ही प्रक्रीया सुरु होऊ शकली नव्हती. आता जिल्हा नियोजन समितीच्या गठन प्रक्रीयेतील अडसर दूर झाला आहे. जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी भरत गोगावले यांची नियुक्ती झाल्यानंतर नियोजन समितीची गठन प्रक्रिया सुरू करण्यासाठी प्रशासकीय तयारी सुरू आहे.

जिल्हा नियोजन समितीचे ४० सदस्य असतात, ज्यात तीन पदसिध्द असतात. जिल्ह्याचे पालकमंत्री हे या समितीचे पदसिध्द अध्यक्ष, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पदसिध्द सदस्य, तर जिल्हाधिकारी हे पदसिध्द सचिव असतात. याशिवाय पालकमंत्र्यांकडून पाच नामनिर्देशित सदस्यांची जिल्हा नियोजन समितीवर नियुक्ती केली जाते. यात प्रादेशिक विकास मंडळाचा एक प्रतिनिधी, संसद आणि विधिमंडळ सदस्यामधून दोन सदस्यांची, तर जिल्हा नियोजन विषयाचे ज्ञान असणाऱ्या दोन सदस्यांचा समावेश असतो.

जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महापालिकेच्या निवडून आलेल्या सदस्यांमधून लोकससंख्येच्या प्रमाणानुसार ३२ सदस्य जिल्हा नियोजन समितीवर निवडून दिले जातात. यात जिल्हा परिषदेतील २० तर नगरपालिका आणि महापालिकांमधील १२ सदस्यांचा समावेश असतो. पालकमंत्र्यांच्या नियुक्तीनंतर आता नियोजन समितीच्या गठन प्रक्रीयेला सुरुवात होत आहे. प्रशासकीय पातळीवर त्यासाठी तयारी सुरू झाली आहे. लवकरच अप्पर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत समितीची गठन प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

# गोळीबार करून खुनाच्या प्रयत्नात फरार असलेल्या मुख्य आरोपीला अटक



**कर्जत : प्रतिनिधी**

पिस्तूलातून गोळीबार करून एका व्यक्तीच्या खुनाचा प्रयत्न केल्यानंतर सुमारे दहा महिन्यांपासून फरार असलेल्या मुख्य आरोपीला कर्जत पोलिसांनी अखेर कोंढावा - पुणे येथून अटक केली आहे. आरोपीकडून गुन्ह्यात वापरल्याचे सांगण्यात आलेले देशी बनावटीचे पिस्तूलही जप्त करण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री पोटलवाडी, पोस्ट गौळवाडी, ता. कर्जत येथे फिर्यादी इस्माईल सैय्यद मालदार (वय ६५) हे आपल्या घरासमोरील मोकळ्या जागेत मुफीज गुलाम मालदार याच्यासोबत जागेच्या वादाच्या अनुषंगाने चर्चा करीत होते. यावेळी मुफीज मालदार याच्यासोबत असलेल्या इतर आरोपींपैकी जतीन संतोष पवार रा. जांभूळवाडी पुणे (वय २४) याने त्याच्याकडील देशी बनावटीचे पिस्तूल फिर्यादीच्या दिशेने रोखून जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने एक राऊंड फायर केल्याचा आरोप आहे. त्यानंतर संबंधित आरोपी घटनास्थळा वरून पसार झाले होते.

घटनेनंतर कर्जत पोलिसांनी या गुन्ह्यात यापूर्वी एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली होती. मात्र, फिर्यादीच्या दिशेने पिस्तूलातून गोळीबार करणारा मुख्य आरोपी जतीन पवार हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. आरोपी सराईत असल्याने तो वारंवार आपला ठावठिकाणा आणि लपण्याची ठिकाणे बदलत असल्याने त्याचा शोध घेणे पोलिसांसमोर आव्हानात्मक ठरत होते. अखेर एका गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी कोंढवा - पुणे येथे एका मित्राच्या राहत्या घरात लपून बसल्याचे निष्पन्न झाले.त्यानुसार कर्जत पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने कारवाई करीत आरोपी जतीन पवार याला ताब्यात घेऊन अटक केली.

कारवाईत कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील, सहायक पोलीस निरीक्षक मनिषा लटपटे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस कर्मचारी केशव नागरगोजे, स्वप्नील येरुणकर, समीर भोईर, विठ्ठल घावस आणि बबन घुले यांनी सहभाग घेतला.

# अभिनव युवक मित्र मंडळाच्या गणेश मंडपाचा मुहूर्त




**पनवेल : वार्ताहर**

अभिनव युवक मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सवाच्या तयारीला उत्साहात सुरुवात झाली. लाडक्या गणपती बाप्पाच्या मंडपाचा मुहूर्त व वास्तुपूजन शहरातील पायोनिअर विभागातील मैदानात विधिवत पार पडले. मान्यवरांच्या हस्ते नारळ वाढवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

अभिनव युवक मित्र मंडळ गेल्या ३५ वर्षांपासून गणेशोत्सवाची परंपरा जपत असून दरवर्षी आकर्षक सजावट, नावीन्यपूर्ण देखावे तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. महिला भगिनींसाठीही विविध उपक्रम राबवून सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात मंडळाने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

यावेळी मंडळाचे कार्याध्यक्ष तथा महापौर नितीन पाटील, अध्यक्ष अल्पेश पडावे, उपाध्यक्ष रुपेश नागवेकर, खजिनदार मयुर चिटणीस तसेच उमेश इनामदार, पत्रकार संजय कदम, महेश सरदेसाई, शैलेश कदम, राजा चव्हाण, सचिन नाझरे, सुधीर देसाई, युवराज कदम, नरेंद्र सोनवणे, हितेश पडावे, प्रवीण सावंत, राहुल सोळंकी, जॉनी जॉर्ज, बाबू डिसूझा, मंगेश चंदने यांच्यासह पनवेल महापालिकेचे स्वच्छता दूत उपस्थित होते.

मान्यवरांच्या उपस्थितीत मंडपाच्या मुहूर्ताचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यंदाही गणेशभक्तांसाठी आकर्षक सजावट, नावीन्यपूर्ण देखावे आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मंडळाच्या वतीने सांगण्यात आले.



# तळा बाजारात मच्छीची आवक वाढली ; खवय्यांची चंगळ

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरात सध्या विविध प्रकारची मच्छीची मोठ्याप्रमाणात आवक वाढली असून मच्छी खव्वयांची चांगलीच चंगळ झाल्याचे पहावयास मिळत आहे.

तालुक्यातील रहाटाड,वाशीह वेली,मजगाव,रोवळा,मांदाड, इत्यादी खाडीकिनारी असणाऱ्या गावांतील मच्छी विक्रेते मच्छी घेऊन तळा बाजारपेठेत येत आहेत.आणि सध्या मच्छी मोठ्याप्रमाणात बाजारात येत असल्याने खव्वये वेगवेगळी मच्छी बोंबील, कोळंबीची आवक जास्त तसेच मांदीली,पापलेट,बघी,खेकडे,बोईट,सुरमई,बांगडा,पाले, इत्यादी आवक वाढली असून खव्वये कोळंबी,पापलेट,या मच्छीलाअधिक मागणी असून खव्वयांची मजा आहे

बाजारात जास्त मच्छी येतआहे व त्यातच श्रावण मास असल्याने मागणी कमी मात्र मच्छी जास्त असल्याने मच्छीचे भाव सध्या तळा बाजारपेठेत गडगडले आहेत . त्यामुळे मच्छी स्वस्त झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.याचा खव्वयांना चांगला फायदा झाला आहे.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगडजिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सोमवार (दि.२४)वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३१५वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून २,९५,०००/-रुपये इतका दंड आकारला आहे. या कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

पान १ वरुन

## अभियंता प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेश प्रभारीपदी आमदार प्रशांत ठाकूर

राज्यातील अभियंता व तांत्रिक क्षेत्रातील विविध घटकांना भाजपच्या संघटनात्मक प्रवाहात सहभागी करून घेत त्यांच्या माध्यमातून विकासाभिमुख विचारांना चालना देण्याचे काम अभियंता प्रकोष्ठच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली या प्रकोष्ठचे राज्यातील कार्य अधिक प्रभावी आणि व्यापक होणार असून नियुक्तीबद्दल त्यांचे भाजप पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते तसेच अभियंता क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत असून नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# स्वातंत्र्यसैनिक नटवरलाल शहा मार्गाचे नामकरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक बाजारपेठेतील मुख्य रस्त्यापासून हायवेकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्याला स्वातंत्र्यसैनिक नटवरलाल लल्लुदास शहा मार्ग असे नामकरण करण्यात आले. सरपंच रितू ठोंबरे यांच्या हस्ते या नामकरण सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी उपसरपंच झिंगेताई, सदस्य मोनिकाताई दबके,सुभाष पवार, निखिल मालुसरे, सदस्य भाऊसाहेब मोरे यांच्यासह ग्रामपंचायतीचे कर्मचारी, नागरिक तसेच शहा कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी योगेंद्र शहा यांनी स्वातंत्र्यसैनिक नटवरलाल शहा यांच्या कार्याची व योगदानाची थोडक्यात माहिती उपस्थितांना दिली. स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृती जपणे आणि त्यांच्या कार्याची भावी पिढीला ओळख करून देणे ही समाजाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

### दुखवटा

## मालुबाई केणी



**उरण :** तालुक्यातील चिरनेर-कातळपाडा येथील सामाजिक कार्यकर्त्या मालुबाई शंकर केणी (७४) यांचे काल २५ ऑगस्ट रोजी पहाटे वाशी नवी मुंबई येथील रुग्णालयात उपचार घेत असताना आकस्मिक निधन झाले आहे. त्यांच्या मागे त्यांचे पती,तीन मुलगे आणि दोन मुली, नातवंडे असा त्यांचा परिवार आहे.

# करंजाडेत बनावट कॉल सेंटरचा पर्दाफाश

## लोनच्या नावाखाली फसवणूक, चौघे गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडेत सुरू असलेल्या कॉल सेंटरवर छापा टाकत पनवेल पोलिसांनी चौघांना अटक केली. त्यांच्याकडून चार लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

करंजाडे येथे काही इसम भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहून कॉल सेंटर चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. कॉल सेंटरमध्ये धनी फायनान्स आणि इतर फायनान्स कंपन्यांतून बोलत असल्याचे सांगून लोन मंजूर करतो, असे सांगून प्रोसेसिंग फी, इन्शुरन्स, होल्डिंग चार्ज, जीएसटी चार्ज अशी कारणे सांगून स्कॅनरद्वारे वेगवेगळ्या बँक खात्यांवर पैसे घेत आणि सर्वसामान्य लोकांची फसवणूक करीत असत.



वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकीर पटेल, पोलीस निरीक्षक अभिजीत अभंग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी २१ ऑगस्ट रोजी से.आर ४, करंजाडे येथील निलगिरी अपार्टमेंटमध्ये छापा टाकला. यावेळी विजय बाबू भंडारी (३६, से. ३, करंजाडे), तुषार अरुण पिंगळे (३४, से. आर ४, करंजाडे), रोहित रंगाप्पा गौडा (२१, रायचूर) आणि दर्शन उमाशंकर (२१, रायचूर) या चौघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून तीन लॅपटॉप, १५ मोबाइल, सात बँकांचे डेबिट कार्ड, ३१ सिमकार्ड, रोख रक्कम, हिशेबाच्या दोन वह्या, डायरी, वायफाय राऊटर, नेटवर्क टर्मिनल डिव्हाइस असा एकूण तीन लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# ६६ तोळे सोने घेऊन पसार झालेला आरोपी ताब्यात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त, वार्ताहर**



पनवेलमधील स्वरूप रिफायनरी ज्वेलर्स शॉपमधून अपहार झालेल्या ६६.२३ तोळे सोन्याचा पनवेल शहर पोलिसांनी ४८ तासांत शोध लावून आरोपीला सोलापूर जिल्ह्यातून ताब्यात घेतले. ६६ लाख ६२ हजार ३०० रुपयांचे ६६६.२३ ग्रॅम वजनाच्या सहा सोन्याच्या लगडी हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

कामगार शुभम खिलारेला सोन्याची शुद्धता तपासण्यासाठी सहा सोन्याच्या लगडी देण्यात आल्या होत्या, मात्र त्याने सोन्याचा अपहार केल्याचे निदर्शनास आल्यानंतर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी विविध पथके तयार करून शोध घेण्याच्या सूचना दिल्या.

पोलिसांनी शहर व रेल्वे स्थानक परिसरातील सीसीटीव्ही तपासले. त्यातून आरोपी कुरुडवाडी, सोलापूर येथे रेल्वेतून उतरल्याचे समजले. त्यानंतर पथकाने त्याच्या मूळ गावी खिलारवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथे जाऊन शुभम खिलारे याला ताब्यात घेतले. ही कारवाई पोलीस उपआयुक्त रश्मी नांदेडकर आणि सहाय्यक पोलीस आयुक्त मधुर भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकिर पटेल, पोलीस निरीक्षक (प्रशासन) अभिजीत अभंग यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली.

# उरण महाविद्यालयाच्या एनएनएस विभागातर्फे वृक्षारोपण उपक्रम

**उरण : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एक वृक्ष आईच्या नावे या केंद्र सरकारच्या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे, इतिहास विभागप्रमुख डॉ. एम.जी. लोणे, प्रा. अनुपमा कांबळे, साई कदम, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे व उपस्थित विद्यार्थ्यांच्या हस्ते कोटगाव ग्राम सुधारणा मंडळाच्या मैदानाच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.



पर्यावरण रक्षा माणूस सुरक्षा, या ब्रीदवाक्याला अनुसरून पर्यावरणाचे रक्षण करायचे असेल तर वृक्षलागवड व वृक्षसंगोपन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्या अनुषंगाने महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी वृक्षारोपण केले जाते. पर्यावरण जागृतीसंदर्भातील जबाबदारी व कर्तव्य विद्यार्थ्यांना व समाजाला कळावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

# स्वरसंस्कार संगीत विद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

संस्कार प्रतिष्ठान अंतर्गत अ‍ॅड. सुरेखा प्रशांत भुजबळ (संगीत विशारद) संचालित स्वरसंस्कार संगीत विद्यालयाचा १२वा वर्धापन दिन व गुरुपौर्णिमा उत्सव नुकताच मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह, ठाणा नाका रोड, पनवेल येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून गुरुवर्या देवताताई सुतार उपस्थित होत्या. तसेच नगरसेविका डॉ. प्रियांका कांडपिळे, डॉ. अस्मिता घरत, अ‍ॅड. शिवानी घरत आणि अ‍ॅड. प्रिती मनोज भुजबळ (भारत सरकार, नोटरी) यांची प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थिती लाभली.



कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन, गुरुवंदना आणि गुरुजनांप्रति कृतज्ञता व्यक्त करून करण्यात आली. गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांना मानवंदना देत विविध कलागुणांचे बहारदार सादरीकरण केले. शास्त्रीय गायन, उपशास्त्रीय गायन, सुगम संगीत, तबला, पेटी, गिटार, भरतनाट्यम तसेच नृत्य आणि वेस्टर्न डान्स अशा विविध कलाप्रकारांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण आणि दर्जेदार सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे सादर केलेला कलाविष्कार. गुरु–शिष्य परंपरेचा वारसा जपत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावरही विद्यालयात विशेष भर दिला जातो.

गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी गुरुजनांप्रति व्यक्त केलेली कृतज्ञता व सादर केलेल्या कलाविष्कारामुळे वातावरण भावपूर्ण झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, विद्यार्थी, पालक व आयोजनामध्ये प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहभाग घेणाऱ्या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. संगीत व संस्काराची सांगड घालून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करणे हेच स्वरसंस्कार संगीत विद्यालयाचे ध्येय आहे, असे विद्यालयाच्या संचालिका अ‍ॅड. सुरेखा भुजबळ यांनी सांगितले.

# सय्यद अकबर यांची भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या प्रदेश महामंत्रीपदी नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीत ज्येष्ठ पत्रकार सय्यद अकबर यांची प्रदेश महामंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अल्पसंख्याक समाजाच्या विविध घटकांमध्ये सातत्याने संपर्क ठेवत सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक आणि संघटनात्मक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे.



भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली, भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रभारी तथा प्रदेश महामंत्री राजेश पांडे तसेच अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या मार्गदर्शनाखाली सय्यद अकबर यांच्यावर प्रदेश महामंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जमाल सिद्धिकी, हाजी एजाज देशमुख यांच्यासह अल्पसंख्याक मोर्चातील ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनातून त्यांनी गेल्या अनेक वर्षांत संघटनात्मक कामाला चालना दिली आहे.

नवनियुक्त प्रदेश महामंत्री सय्यद अकबर यांनी या नियुक्तीसाठी प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी तसेच अल्पसंख्याक मोर्चातील ज्येष्ठ नेत्यांचे आभार मानले. पक्षाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संघटन मजबूत करण्यासाठी आणि अल्पसंख्याक समाजातील विविध घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# दर्ग्यावरून पडून तरुणाचा मृत्यू

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील पीर करमअली शाह दर्ग्यावर झेंडा लावण्यासाठी गेलेल्या तरुणाचा खाली पडून मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि. २४) दुपारच्या सुमारास घडली. अविम मणियार (२९) असे त्याचे नाव आहे.

२४ ऑगस्ट रोजी अविम मणियार हा पनवेल महापालिकेसमोरील पीर करमअली शाह दर्ग्यावर झेंडा लावण्यासाठी वर चढला होता. यावेळी तो खाली पडला. त्याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रामचंद्र यमगर करीत आहेत.

# ‘सीकेटी’त मादाम कामा यांच्या योगदानाचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मादाम भिकाजी कामा यांच्या उल्लेखनीय योगदानाचा आणि कर्तृत्वाचा गौरव करणारा कार्यक्रम सीकेटी विद्यालय, इंग्रजी माध्यमिक विभागात मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमातून भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या अग्रगण्य भूमिकेवर तसेच राष्ट्रीय ध्वजाच्या इतिहासातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानावर प्रकाश टाकण्यात आला.



मादाम कामा यांनी १९०७ मध्ये जर्मनीतील स्टुटगार्ट येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेत भारतीय राष्ट्रीय ध्वजाच्या प्रारंभिक स्वरूपातील ध्वज फडकावला होता. ही ऐतिहासिक घटना भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वपूर्ण टप्पा ठरली. सूत्रसंचालन मनीषा नारखेडे यांनी केले. मुख्याध्यापिका स्वाती काळे आणि पर्यवेक्षिका नीरजा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. इयत्ता ७वी ‘क’ मधील विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीत “ध्वज उंच तिरंगा डोले रे” सादर केले. त्यानंतर मादाम भिकाजी कामा यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंग आणि त्यांच्या योगदानावर आधारित प्रभावी लघुनाटिका सादर करण्यात आली.

या लघुनाटिकेत गौरी सावंत, सुशीला चौधरी, सखम आणि दुर्गेश म्हात्रे यांनी भूमिका साकारल्या. सरोज जितेकर यांनी मादाम भिकाजी कामा यांच्या प्रेरणादायी जीवनावर आणि कर्तृत्वावर माहितीपूर्ण भाषण केले. पर्यवेक्षिका नीरजा यांनी मादाम कामा यांच्या भारतीय राष्ट्रीय ध्वजाच्या प्रारंभिक स्वरूपाच्या ध्वजारोहणातील ऐतिहासिक योगदानावर तसेच भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या चिरंतन वारशावर प्रकाश टाकला. जिविका पाटील आणि साई भोसले यांनीही आपले विचार भाषणातून व्यक्त केले.

हा कार्यक्रम वैशाली लाऊत्रे, चैताली सुर्वे, सरोज जितेकर, मनीषा नारखेडे, मंजुषा भगत, वर्षा वारे, प्रमोद शेळके व अमित घरत यांच्या प्रयत्नांतून यशस्वीपणे सादर करण्यात आला.

# पनवेलमध्ये श्रावण सखी आनंदसोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रावणाच्या हिरवाईत, परंपरेच्या सुगंधात आणि स्त्रीशक्तीच्या उत्साहात ‘श्रावण सखी २०२६’ आनंदसोहळा रविवारी (दि. २३) आंगण बँक्वेट्स, नवीन पनवेल येथे दिमाखात संपन्न झाला. सखी इव्हेंट्स व इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमाला सखींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीच्या प्रेसिडेंट स्नेहल कल्याणकर, सेक्रेटरी विजेता कोठारी, पास्ट प्रेसिडेंट ध्वनी तन्ना, क्लब सदस्या, सखी इव्हेंट्सच्या संस्थापिका अरुंधती बंदसोडे यांच्या कल्पक संकल्पनेतून व काटेकोर नियोजनातून साकारलेल्या या सोहळ्यात श्रावणातील पारंपरिक खेळ, मंगळागौरीची गाणी, नृत्य आणि पारंपरिक वेशभूषेने वातावरण अक्षरशः उत्साहाने भारून गेले. कार्यक्रमाला माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, सुहासिनी शिवनेकर, नवीन पनवेलच्या नगरसेविका राजश्री वावेकर, पीएसएमच्या शीतल ठक्कर तसेच जीएमआरआरसीच्या शीतल मोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

शीतल ठक्कर यांनी परीक्षक म्हणून उत्कृष्ट कार्य बजावत सहभागी सखींच्या कलागुणांचे बारकाईने निरीक्षण केले. उत्कृष्ट पारंपरिक वेशभूषेसाठी शुभांगी दीक्षित, बेस्ट परफॉर्मन्ससाठी रूपाली शेलवले आणि बेस्ट नृत्यासाठी ज्योती यांना गौरविण्यात आले] तर वसुधा, रुचिता आणि विशाखा यांनी लकी ड्रॉची बक्षिसे पटकावली. अरुंधती बंदसोडे व अर्चना पाटील यांच्या ओघवत्या निवेदनाने कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली. मंगळागौरीच्या सुरेल गीतांनी वातावरणात पारंपरिक संस्कृतीची अनुभूती निर्माण केली, तर तबलावादक मनोज खाकल यांच्या तालबद्ध तबलावादनाने या आनंद सोहळ्याला सुरेल साथ लाभली.

कार्यक्रमातील प्रत्येक आनंदाचा क्षण राजवीर व हिमांशू यांनी आपल्या कॅमेऱ्यात चिरंतन केला. सर्व सहभागी सख्या, अतिथी, सहकारी, कलाकार आणि कार्यक्रमाशी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष जोडलेल्या प्रत्येकाच्या मनापासूनच्या सहकार्यामुळेच सोहळा सुंदर, उत्साही आणि संस्मरणीय ठरला. प्रत्येक सखीच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य आणि उत्साह हीच ‘श्रावण सखी २०२६’च्या यशाची खरी पावती ठरली.

# मुलींच्या सुरक्षेसाठी पनवेल मनपाचे पथनाट्य अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थी व युवकांमध्ये जनजागृती करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या ‘पथनाट्य जनजागृती अभियानाचा’ शुभारंभ महापौर नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. २५) लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, शाळा क्र. १, पनवेल येथे करण्यात आला.

यावेळी महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर, प्रिती जॉर्ज, रूचिता लोंढे, डॉ.प्रियंका कांडपिळे, डॉ. अस्मिता घरत, योगिता फडके यांसह शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, महिला बालकल्याण विभागप्रमुख कीर्ती महाजन, पालिका अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



अल्पवयीन मुलींचे शोषण रोखण्यासाठी ‘गुड टच बॅड टच’ची जाणीव तसेच युवकांमध्ये नैराश्यातून येणारे आत्महत्येचे विचार रोखण्यासाठी संवाद, योग्य मार्गदर्शन आणि वेळेवर मदत घेण्याचे महत्त्व पथनाट्याच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आले.

अडचणीत पालक, शिक्षक वा विश्वासू व्यक्तींशी संवाद साधून मदत घ्यावी, असा संदेश या माध्यमातून देण्यात आला आहे.

**प्रत्येक मुलीला सुरक्षिततेची जाणीव आणि प्रत्येक युवकाला अडचणीच्या काळात योग्य आधार मिळणे आवश्यक आहे. मुलांनी व युवकांनी मनातील समस्या मोकळेपणाने व्यक्त कराव्यात आणि योग्य वेळी मदत घ्यावी. सुरक्षित बालपण आणि सकारात्मक युवा पिढी घडविणे हाच या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.**

**–ममता म्हात्रे, सभापती,** महिला बालकल्याण समिती, पनवेल महानगरपालिका

## संपादकीय

# सुरक्षेशी तडजोड नको

एनआयसीयु आणि एसएनसीयुसारख्या नवजातांसाठीच्या विभागांमध्ये परिस्थिती वेगळी असते. स्वतःहून बाहेर पडू न शकणारी, ऑक्सिजनवर अवलंबून असलेली बालके असतात. त्यामुळे प्रत्येक बाळासाठी पर्यायी सुरक्षित जागा, पोर्टेबल ऑक्सिजन, प्रशिक्षित अतिरिक्त मनुष्यबळ आणि आपत्कालीन स्थलांतराची स्पष्ट योजना आधीच तयार असली पाहिजे.

**अमरावतीच्या जिल्हा महिला रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागातील आगीची घटना अतिशय दुर्दैवी आहे. उपचारांसाठी रुग्णालयात दाखल झालेल्या तीन नवजात बालकांचा या दुर्दैवी घटनेत मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबियांचे दुःख शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. आग लागली तेव्हा विभागात ३९ नवजात बालके होती. डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत व प्रयत्नांची पराकाष्ठा करून ३६ बालकांना विभागाबाहेर काढले. या तत्परतेमुळे मोठी जीवितहानी टळली आहे. हे करताना या कर्मचाऱ्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घातला. बाळांना वाचवणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले असून मृत बालकांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तसेच जखमी बालकांचा उपचारखर्चही सरकारकडून केला जाणार आहे. आगीच्या या घटनेकरिता दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल ही भूमिका योग्यच आहे. दुर्दैवाची बाब अशी की गेल्या सुमारे पाच-सहा वर्षांत देशात नवजात विभागांना आगी लागण्याच्या इतरही काही घटना घडल्या आहेत. जानेवारी २०२१ मध्ये भंडारा जिल्हा रुग्णालयातील एसएनसीयु आगीत दहा नवजातांचा मृत्यू झाला. सप्टेंबर २०२२ मध्ये अमरावतीच्या याच जिल्हा महिला रुग्णालयात एनआयसीयुमध्ये आग लागली होती. तेव्हा २२ बालकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले होते. मे २०२४ मध्ये दिल्लीतील एका खाजगी नवजात रुग्णालयात सात बालकांचा मृत्यू झाला तर नोव्हेंबर २०२४ मध्ये झाशीच्या वैद्यकीय महाविद्यालयातील एनआयसीयु आगीत दहा नवजातांचा मृत्यू झाला होता. नवजातांसाठीच्या या विभागांमध्ये आगीच्या घटनांचा धोका का संभवतो याची सखोल चौकशी होण्याची गरज आहे. तसेच या सर्व घटना पाहता रुग्णालयातील अग्निसुरक्षेची खबरदारी जास्तीत जास्त घेतली जायला हवी आहे. प्रत्येक सरकारी रुग्णालयाचे नियमित आणि स्वतंत्र फायर ऑडिट, विद्युत यंत्रणेचे तांत्रिक ऑडिट आणि सर्व वैद्यकीय उपकरणांची नियोजित देखभाल अनिवार्य असली पाहिजे. वॉर्मर, व्हेंटिलेटर, ऑक्सिजन यंत्रणा, मॉनिटर आणि इतर उपकरणांची केवळ दुरुस्ती नव्हे तर त्यांची सुरक्षा-चाचणी देखील नियमितपणे झाली पाहिजे. वारंवार बिघडणारे उपकरण तातडीने सेवेतून काढले गेले पाहिजे. अग्निशमन यंत्रणेशी संबंधित सर्व उपकरणे, आपत्कालीन वीजपुरवठा आणि स्पष्ट आपत्कालीन मार्ग यांची प्रत्यक्ष तपासणी झाली पाहिजे. रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ, सुरक्षा कर्मचारी आणि इतर कर्मचाऱ्यांना नियमित फायर-ड्रिल आणि नवजात बालकांच्या सामूहिक स्थलांतराचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. अमरावतीच्या या दुर्घटनेतून संबंधित व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न व्हायला हवा. सरकारने चौकशी करावी, दोष निश्चित करावा आणि त्याचबरोबर राज्यातील प्रत्येक शासकीय रुग्णालयाची अग्निसुरक्षा व्यवस्था नव्याने तपासावी. कारण रुग्णालयात उपचारासाठी येणारा प्रत्येक नागरिक तेथील संरक्षण व्यवस्थेवर विश्वास ठेवून येतो. आणि नवजात बालकांच्या बाबतीत तर हा विश्वास आणखी मोठी जबाबदारी बनतो. अशी दुर्घटना पुन्हा कधीही घडू नये, हीच या निष्पाप बालकांना खरी श्रद्धांजली ठरेल.**

# कौशल्यातून समृद्धीकडे... विकासाची नवी वाट

विकास म्हणजे नेमके काय? विकास म्हणजे फक्त मोठ्या इमारती, मोठे रस्ते किंवा मोठी शहरेच नाहीत. खरा विकास तेव्हाच होतो जेव्हा प्रत्येक माणसाच्या हाताला काम मिळते, त्याच्या कामाला योग्य किंमत मिळते आणि त्याच्या कुटुंबाचे जीवनमान उंचावते. आज आपल्या आजूबाजूला अशा अनेक संधी आहेत ज्या आपल्याला या स्वावलंबी विकासाकडे घेऊन जातात. त्यासाठी लागते फक्त एक गोष्ट – आपल्या अंगी असलेल्या कौशल्याला ओळखणे आणि त्याला नव्या काळाची जोड देणे.



पूर्वी एक काळ होता जेव्हा पारंपरिक कौशल्ये पिढ्यानपिढ्या चालत यायची. सुतारकाम, कुंभारकाम, विणकाम, शेतीला पूरक जोडधंदे. या कौशल्यांवरच संपूर्ण गावाची अर्थव्यवस्था चालायची. काळ बदलला, गरजा बदलल्या, पण या कौशल्यांचे महत्त्व संपले नाही, उलट त्यांचे रूप बदलले. आज त्याच कौशल्यांना जर थोडी आधुनिक माहिती, थोडे डिझाईन आणि थोडे तंत्रज्ञान जोडले तर त्यातून मोठा व्यवसाय उभा राहू शकतो.

प्रत्येक परिसरात काही ना काही वैशिष्ट्य असतेच. कुठे बांबू मुबलक आहे, कुठे हातमागाचे काम उत्तम होते, कुठे फळे-भाज्या जास्त पिकतात. यालाच आज 'स्थानिकातून वैश्विक' असे म्हटले जाते. म्हणजे आपल्या भागात जे उत्तम पिकते किंवा बनते, त्यावर प्रक्रिया करून त्याला चांगले पॅकिंग, चांगली माहिती जोडून दूरपर्यंत पोहोचवणे. उदाहरण घ्यायचे झाले तर, कोकणातील आंब्यापासून फक्त आंबा विकण्याऐवजी त्यापासून आमरस, लोणचे, पापड बनवणे. घाटमाथ्यावरच्या भागात औषधी वनस्पतींपासून साबण, तेल बनवणे. शहराच्या जवळ असलेल्या महिलांनी घरगुती खाद्यपदार्थ, पापड-कुरडया एकत्र येऊन बनवणे. यातून एकाच वेळी तीन गोष्टी साध्य होतात. स्थानिक मालाला भाव मिळतो, वाहतुकीचा खर्च वाचतो आणि रोजगार हा गावातच, घराजवळच तयार होतो.

आज कामाचे स्वरूप खूप वेगाने बदलत आहे. पूर्वी एकच काम आयुष्यभर पुरायचे, आज प्रत्येकाला नवे काहीतरी शिकावे लागते. सुदैवाने शिकण्याची साधने आता प्रत्येकाच्या हातात आहेत. मोबाईलवरूनच तुम्ही उत्तम शेती कशी करावी, सेंद्रिय खत कसे बनवावे, फोटो-व्हिडिओ एडिटिंग, ब्युटी पार्लरचे नवे कोर्स, इलेक्ट्रिक काम, प्लंबिंगचे आधुनिक तंत्रज्ञान, संगणकाचे ज्ञान हे सगळे शिकू शकता. अनेक ठिकाणी तरुण-तरुणी आता अशा कौशल्य प्रशिक्षण केंद्रांमध्ये उत्साहाने जात आहेत. दोन-तीन महिन्यांचे प्रशिक्षण घेऊन ते स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करत आहेत. कोणी मोबाईल दुरुस्तीचे दुकान टाकते, कोणी बेकरी सुरू करते, कोणी टेलरिंगमध्ये नव्या डिझाईनचे कपडे शिवते. हा छोटा वाटणारा व्यवसायच उद्या दोन-तीन लोकांना आणखी रोजगार देऊ शकतो. हाच तर विकासाचा खरा पाया आहे.

**महिला आणि युवा विकासाचे दोन मजबूत खांब**

कोणत्याही समाजाच्या विकासात महिलांचा सहभाग खूप महत्त्वाचा असतो. आज बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी हे दाखवून दिले आहे. दहा-पंधरा महिला एकत्र येतात, थोडी-थोडी बचत करतात आणि त्यातूनच छोटा व्यवसाय सुरू करतात. एकमेकींना मदत करणे, हिशोब ठेवणे, मार्केटमध्ये जाऊन विक्री करणे या सगळ्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढतो. त्यांचे आर्थिक स्वावलंबन हे संपूर्ण कुटुंबाच्या शिक्षण आणि आरोग्यावर चांगला परिणाम करते.

त्याचप्रमाणे युवकांकडे प्रचंड ऊर्जा आणि नव्या कल्पना आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन आणि थोडी संधी मिळाली तर ते पारंपरिक व्यवसायालाही नवे रूप देऊ शकतात. उदाहरणार्थ, शेतकरी कुटुंबातील तरुण आता थेट ग्राहकांना भाजीपाला पोहोचवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करत आहे. हातमागावरचे कपडे आता ऑनलाइन फोटो टाकून विकले जात आहेत. तंत्रज्ञान आणि मेहनत यांची ही सांगड म्हणजेच आजचा स्मार्ट विकास आहे.

विकास करताना निसर्गाला जपणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. पावसाचे पाणी अडवणे, जिरवणे, कचऱ्यापासून खत बनवणे, सौर ऊर्जेचा वापर करणे या गोष्टी आता खर्चाच्या नाहीत तर बचतीच्या झाल्या आहेत. अनेक गावांनी आणि सोसायट्यांनी एकत्र येऊन पाणी आडवण्याचे छोटे-छोटे बंधारे बांधले, झाडे लावली. यातून पाण्याची पातळी वाढली आणि शेती अधिक हिरवी झाली. हा विकास डोळ्यांना दिसत नाही पण पुढच्या पिढीसाठी खूप मोठा आधार बनतो.

विकास हा काही बाहेरून येणारी गोष्ट नाही. तो आपल्यातच आहे. आपल्या हातात, आपल्या कौशल्यात आणि आपल्या एकत्र येण्याच्या वृत्तीत आहे. मी एकटा काय करू शकतो, असा विचार करण्यापेक्षा मी माझ्या क्षेत्रात काय उत्तम करू शकतो, हा विचार जेव्हा प्रत्येक जण करू लागेल तेव्हा आपोआप मोठा बदल घडेल.

आज गरज आहे ती एकमेकांच्या कामाचे कौतुक करण्याची, स्थानिक वस्तूला प्राधान्य देण्याची आणि सतत काहीतरी नवे शिकत राहण्याची. एक छोटीशी सुरुवात, एक नवीन कौशल्य आणि सातत्यपूर्ण मेहनत या तीन गोष्टींवरच उद्याचा समृद्ध आणि स्वावलंबी समाज उभा राहणार आहे.

तुमच्या कौशल्याला मिळणारी साथ मोठी असेल. एकट्याने सुरुवात करणे कठीण वाटत असेल, तर लक्षात ठेवा तुम्ही एकटे नाही आहात. आज केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेक योजना तुमच्याच सारख्या कष्टकऱ्यांसाठी, कारागिरांसाठी आहेत. उदा. पंतप्रधान विश्वकर्मा योजनेतून पारंपरिक १८ बलुतेदार कारागिरांना मोफत प्रशिक्षण, टूलकिट आणि कमी व्याजावर कर्ज दिले जाते. स्किल इंडिया आणि मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून तरुणांना वेगवेगळ्या क्षेत्रातील आधुनिक प्रशिक्षण दिले जाते. बचत गटातील महिलांसाठी उमेद अभियान, लेक लाडकी सारख्या योजनांतून भांडवल उपलब्ध होते. गरज आहे ती फक्त आपल्या जवळच्या ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा कौशल्य विकास केंद्रात जाऊन माहिती घेण्याची. अनेकदा माहितीअभावी आपण या संधींना मुकतो.

मोठी पदवी नसली तरी चालेल, पण एका कौशल्यात पारंगतता असेल तर बाजारपेठ तुम्हाला शोधत येते. आधी माल विकण्यासाठी बाजारात जावे लागायचे. आज बाजार तुमच्या मोबाइलमध्ये आहे. तुम्ही बनवलेले पापड, लोणचे, हातमागाचे टॉवेल, बांबूच्या टोपल्या यांचे चांगले फोटो काढून WhatsApp, Instagram किंवा Amazon, Flipkart सारख्या प्लॅटफॉर्मवर टाकले तर थेट मुंबई, पुण्याचेच नव्हे तर परदेशातील ग्राहकही मिळू शकतात. यासाठी फक्त तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत-उत्पादनाची गुणवत्ता टिकवणे, वेळेवर डिलिव्हरी देणे आणि ग्राहकांशी प्रामाणिकपणे बोलणे. म्हणूनच शिकत राहा, एकत्र या आणि आपल्या कौशल्याला व्यवसायाचे रूप द्या. कारण उद्याचा भारत हा मोठ्या कारखान्यांबरोबरच अशा लाखो छोट्या, स्वावलंबी आणि कौशल्याधारित उद्योजकांवरच उभा राहणार आहे.

(साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# दुचाकीचा टायर प्रेशर किती दिवसांनी तपासावा?

आज अनेक जण रोजच्या प्रवासासाठी दुचाकी चालवतात. दुचाकी चालवणे अधिक सोयीस्कर वाटते. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत दुचाकीचे महत्त्व वाढत आहे. वाहतूक कोंडीपासून आणि लहान मोठ्या रस्त्यांवरून प्रवास करताना दुचाकी अधिक फायदेशीर ठरते. आजच्या या जगात, दुचाकीमध्ये अनेक बदल आणि नवीन फीचर्स दिसून येतात. सुरक्षेशी संबंधित अनेक नवीन फीचर्स दुचाकीमध्ये अपडेट केलेले दिसून येतात.



खूप जास्त वाहतूक कोंडी आणि लहान रस्त्यांमुळे अनेक दुचाकीच्या टायरमधील एअर प्रेशर कमी झालेले दिसून येते. याचा थेट परिणाम मायलेजवर पडतो. त्यामुळे एका ठराविक काळानंतर टायर प्रेशर चेक करणे महत्त्वाचे आहे. यामुळे दुचाकी चांगली मायलेज देते. तुम्ही दर किती दिवसांनी तुमच्या दुचाकीचा टायर प्रेशर चेक करता? आज आपण त्याविषयी जाणून घेणार आहोत तसेच टायर प्रेशर तपासण्याचे फायदे सुद्धा जाणून घेणार आहोत.

आपण ७ ते १० दिवसांमध्ये एकदा टायर प्रेशर तपासणे आवश्यक आहे. याशिवाय काही लोक नियमित दुचाकीने दूरचा प्रवास करतात आणि रस्त्यात खराब रस्त्यावरून जावे लागते त्यांनी आठवड्यातून एकदा दुचाकीचे टायर प्रेशर तपासावे. यामुळे तुम्ही सुरक्षित प्रवास करू शकता.

दुचाकीचे टायर प्रेशर योग्य असेल तर इंधनची कार्यक्षमता वाढते. ज्यामुळे तुमची दुचाकी चांगली मायलेज देऊ शकते. याशिवाय योग्य टायर प्रेशर असल्याने रस्त्यावर दुचाकीची ग्रिप चांगली राहते आणि गाडी घसरून पडण्याचा धोका कमी होतो.


याशिवाय टायरमध्ये कमी प्रेशर असेल तर टायर फुटू शकतो. त्यामुळे दुचाकीमध्ये कंपनीने सुचविलेल्या पीएसाय नुसार हवा भरावी.

जर तुम्ही कुठे बाहेर फिरायला जात असाल तर दुचाकीचे टायर प्रेशर तपासून घ्यावे, ज्यामुळे तुम्ही सुरक्षित प्रवास करू शकता.

वाहन चालवताना काळजी घेणे गरजेचे आहे. सतर्कता बाळगल्यास अपघात टाळता येतात. अन्यथा स्वत:सह इतरांनाही हानी पोहचू शकते.

# पत्रकार-नाटककार कृष्णाजी खाडिलकर

कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर उर्फ काकासाहेब खाडीलकर यांचे मराठी साहित्य, पत्रकारिता, राजकारण यामध्ये अतिशय मोठ्या स्वरूपाचे योगदान आहे. मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास तर त्यांच्या योगदानाने सुवर्णाक्षरी झाला आहे.१९१७ साली पुण्यात झालेल्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते. २३ नोव्हेंबर १९७२ रोजी जन्मलेले खाडीलकर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वर्षभरातच म्हणजे २६ ऑगस्ट १९४८ रोजी कालवश झाले. त्यांचा जन्म व शालेय शिक्षण सांगलीत झाले. तत्वज्ञान विषय घेऊन बीए झाल्यावर त्यांनी सांगलीत दोन वर्षे शिक्षकाची नोकरी केली. पुढे ते कायद्याच्या अभ्यासासाठी मुंबईला गेले. तेथे लेखन करू लागले. केसरीत लिहू लागले.१९०१ मध्ये 'गनिमी काव्याचे युद्ध' ही लेखमाला लिहिली.



## निमित्त

दोन वर्षे ते नेपाळ मध्ये होते. तेथे त्यांनी टिळकांच्या सांगण्यानुसार शस्त्रांचा कारखाना सुरू करण्याचा प्रयत्न केला अशी चर्चा होती.ही गोष्ट कानोकांनी होऊ लागली तसे ते मायदेशी परतले.१९०५ साली पुन्हा केसरीत काम करू लागले. टिळकांची भाषाशैली ज्यांनी आत्मसात केली.लोकमान्यांच्या स्वराज्यवादी जहाल भूमिकेशी ठाम राहून त्यांनी केसरीत लेखन केले. टिळकांच्या अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवादाचा त्यांनी पुरस्कार केला.ते १९०७ मध्ये तिसऱ्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते. १९०८ पासून टिळकांच्या तुरुंगवासाच्या काळात ते केसरीचे संपादक होते. १९१० मध्ये केसरीचे संपादकत्व त्यांनी सोडले. १९१३ मध्ये बाल्कन युद्धावरील लेखमाला लिहिली. १९१४ मध्ये चित्रमयजगत मध्ये पहिल्या महायुद्धावरील लेखमालेस प्रारंभ केला. १९१८ मध्ये लोकमान्य टिळक व न. चिं. केळकर हे परदेशी गेल्यामुळे केसरीचे ते पुन्हा संपादक झाले.त्यांचे लेखन वैशिष्ट्य सांगताना मराठी वांग्मय कोषामध्ये म्हटले आहे की, तात्विक बैठकीचा बैठकीचा आभास उत्पन्न करून प्रचाराचा मुद्दा ठाशिवपणे मांडण्याचे प्रचारकी कौशल्य,भावनात्मक, विकारवशता आणि पंडित्य यांच्या संमिश्र रसायनाने लेखन परिणामकारक करण्यातील हातोटी ही त्यांचा लेखनाची वैशिष्ट्ये होती. प्रतिपक्षाची हाकनाक टवाळी, निंदा त्यांनी त्यांचे लेखन क्वचित डागाळलेले दिसते. लोकमान्यांच्या निधनादरम्यानच म्हणजे १९२० साली खाडीलकर केसरीतून बाहेर पडले.'लोकमान्य ' या नियतकालिकाचे संपादक बनले. १९२३ मध्ये त्यांनी ' नवाकाळ ' हे वृत्तपत्र सुरू केले ते आजही सुरू आहे.

१९२७मध्ये हिंदुमुसलमानांच्या वादावरील लेखाबद्दल नवाकाळवर खटला होऊन खाडिलकरांना दंडाची शिक्षा झाली. १९२९ मध्ये राजद्रोहाचा खटला झाला व एक वर्षाची शिक्षा झाली. याच दरम्यान त्यांना अर्धांगवायूचा झटका आलाखाडिलकरांनी वृत्तपत्रीय लेखनाबरोबरचा अनेक पुस्तके लिहिली.कांचनगडची मोहना, सवाई माधवराव यांचा मृत्यु, कीचकवध, संगीत बायकांचे बंड, भाऊबंदकी, प्रेमध्वज, संगीत मानापमान, संगीत विद्याहरण, सत्त्वपरीक्षा, संगीत स्वयंवर, संगीत द्रौपदी, संगीत त्रिदंडी संन्यास, संगीत मेनका, सवती-मत्सर आणि संगीत सावित्री आदी नाटके लिहिली. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# कॅल्शियमच्या कमतरतेने नखे, हाडे होतात ठिसूळ

कॅल्शियमची कमतरता भासल्यास शरीरात अनेक लक्षणं दिसून येतात जसं की कंबर, पाय, कुल्ह्यांमध्ये वेदना होतात, मांसपेशी कमकुवत होतात, दात कमकुवत होतात, कॅव्हिटीजी आणि हिरड्यांच्या समस्याही उद्भवतात. नखं पातळ होतात. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे शरीर थकल्यासारखं वाटतं.



कॅल्शियम हा हाडं आणि दातांच्या मजबूतीसाठी आवश्यक असलेला घटक आहे ज्यामुळे ऑस्टिओपोरोसिस सारख्या आजारांचा धोका टाळता येतो. कॅल्शियम मांसपेशींचे संकुचन होण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. कॅल्शियममुळे रक्ताच्या गुठळ्याही तयार होत नाहीत. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडं कमकुवत होतात याव्यतिरिक्त नखांमध्येही लक्षणं दिसून येतात.

कॅल्शियमच्या कमतरतेची लक्षणे :

वॉशिग्टन नॅशनल हेल्थ सर्विसच्या रिपोर्टनुसार कॅल्शियमच्या कमतरतेमुळे अनेक लक्षणे दिसून येतात जसे की, कंबरेत वेदना, मांसपेशी कुमकुवत होणे, दातांमध्ये वेदना, चिंताग्रस्तता हिरड्यांच्या समस्या, नखं पातळ होणं कॅल्शियमच्या कमतरतेमुळे शरीराला थकवा येतो. जेव्हा शरीरात कॅल्शियमची कमतरता भासते तेव्हा नखं पातळ होतात आणि तुटू लागतात. हाडांतून कॅल्शियम कमी होणे याला ऑस्टिओपेनिया असं म्हणतात. जेव्हा ते सौम्य असते तेव्हा या स्थितीला ऑस्टिओपोरोसिस असे म्हणतात.

नखं आणि हाडं वेगवेगळ्या गोष्टींपासून बनले असले तरी बऱ्याचप्रमाणात एकसारखेच असतात. यासाठीच नखं खराब होणं हे हाडांच्या कमकुवतपणाचे लक्षण आहे. कॅल्शियमच्या कमतरतेनं नखांची वाढ कमी होते फक्त कॅल्शियमच नाही तर शरीरात इतर पोषक तत्वांची कमतरता असल्यासही नखांची वाढ कमी वेगानं होते. कॅल्शियमयुक्त दूध, दही, पनीर, हिरव्या भाज्या, सोयाबीन, बदाम, संत्री या खाद्यपदार्थांचा आहारात समावेश करा.

फोर्टिफाईड सोया आणि राईस ड्रिंक्स, फोर्टिफाईड ज्यूस आणि माशांमध्ये देखिल कॅल्शियम असते. द्रव पावडर, गोळ्या कॅप्सूलच्या माध्यमातून तुम्हाला पुरेसे कॅल्शियम मिळू शकते. आपल्या शरीरात कॅल्शियम कमी आहे ते अनेकांना माहिती नसते. तुमच्या शरीराला पुरेसे कॅल्शियम मिळत आहे का हे पाण्यासाठी तुम्ही हाडांची घनता चाचणी करू शकता.

# श्रीवर्धनमध्ये लावणीची कामे १००% पूर्ण, पावसाने दडी मारल्याने भातशेतीला धोका!

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये लावणीची शंभर टक्के कामे पूर्ण झाली आहेत. परंतु पावसाने दडी मारल्यामुळे शेतातील पाणी कमी झाले आहे. ऑगस्ट महिना सुरू झाल्यापासूनच समुद्रदेखील शांत झाला आहे. त्यामुळे पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे. श्रीवर्धन तालुक्यात यावर्षी सरासरीपेक्षा खूप कमी पाऊस पडला आहे. जर तालुक्यात पाऊस अजून पडला नाही तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. शेतकऱ्यांच्या लावण्या तर पूर्ण झाल्या आहेत. परंतु शेतात पाणी नसल्यामुळे खत मारू शकत नाही. ज्या वेळेला भरपूर पाऊस पडेल शेतात थोडं पाणी होईल. त्या वेळेलाच भाताला खत लावता येते.

यावर्षी पावसाने उशिरा सुरुवात केली असली तरी पण, भाताची लागवड चांगल्या प्रमाणात रुजली होती व लावणीच्या वेळी देखील योग्य प्रमाणात पाऊस पडत होता, परंतु लावण्या पूर्ण झाल्यानंतर पावसाने दडी मारल्यामुळे हवेमध्ये उष्म्याचे प्रमाण देखील खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे. हवेतील सापेक्ष आर्द्रता वाढत असल्यामुळे घाम येण्याच्या प्रमाणात देखील वाढ झाली आहे. समुद्र शांत झाल्यामुळे मासेमारी हंगाम चांगल्या प्रमाणात सुरू झाला आहे. परंतु भात शेतीला पाऊस न पडणे हे धोकादायक आहे. श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणारा रानवली पाझर तलावदेखील अद्याप पर्यंत पूर्ण भरलेला नाही. त्यातच ठिकठिकाणी वारंवार जलवाहिन्या फुटत असल्यामुळे पाणी वाया जात असल्याने धरणात पाणीसाठा होईल की नाही याची देखील शाश्वती नाही.

सध्या मघा नक्षत्र चालू असून त्याचे वाहन मोर आहे. वाहन मोर असल्यानंतर पाऊस बऱ्यापैकी पडतो. परंतु मघा नक्षत्रामध्ये पाऊस अत्यल्प झाला आहे. ३० ऑगस्ट रोजी पुरवा फाल्गुनी नक्षत्र निघणार असून त्याचे वाहन गाढव आहे. पर्यायाने या वेळेलादेखील कमी पावसाची शक्यता असते. १३ सप्टेंबर रोजी उत्तरा फाल्गुनी नक्षत्र सुरू होणार असून गणेशोत्सवाच्या एक दिवस अगोदर हे नक्षत्र निघणार आहे. याचे वाहन बेडूक असल्यामुळे यावेळी भरपूर पाऊस पडेल. असा अंदाज वर्तवण्यात येतो.

## टेमपाले येथे आज ईद-ए-मिलाद सणानिमित्त रक्तदान शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील जमातुल मुस्लिमीन टेमपाले यांच्या वतीने ईद-ए मिलाद -उन -नबी निमित्ताने साबूसिद्धिक हॉस्पिटल मुंबई रक्तपेढी यांच्या विशेष सहकार्याने बुधवार दि.२६ ऑगस्ट रोजी सकाळी ८:३० ते सायंकाळी ४ या वेळेत जामा मस्जिद टेमपाले येथील सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात जास्तीतजास्त रक्तदात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान करावे असे अवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. सदर रक्तदान शिबिराच्या अधिक माहितीसाठी अब्दुल अजीज गजगे मो.नं.९८२३९७५७१८ व मुफ्ती मुजफ्फर मो.नं.८६९८३०६१६१ यांच्याकडे संपर्क साधण्याचे अवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## रोहा पोलिसांची तीन गावठी दारू अड्ड्यांवर कारवाई, लाखो रुपयांचा मुद्देमाल नष्ट

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यात अवैध गावठी दारू निर्मिती आणि विक्रीला आळा घालण्यासाठी रोहा पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू केला असून, अवघ्या दोन दिवसांत वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकत मोठ्या प्रमाणात हातभट्टीसाठी वापरण्यात येणारे रसायन व तयार दारू जप्त केली आहे. या कारवाईमुळे जंगल परिसरात सुरू असलेल्या अवैध दारू निर्मिती करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

२३ ऑगस्ट रोजी रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टिटवी गावाजवळील जंगल परिसरात गावठी हातभट्टी सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला. यावेळी १२ निळ्या रंगाच्या प्लास्टिक ड्रममध्ये तब्बल २,४०० लिटर गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन, ॲल्युमिनियमचे गावठी दारू गाळण्याचे सतेले व झाकण तसेच १० लिटर तयार गावठी दारू, असा सुमारे १ लाख ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला.

जंगलातून हा मुद्देमाल वाहून नेणे अवघड असल्याने प्लास्टिकचे ड्रम, रसायन व इतर साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. याप्रकरणी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

२२ ऑगस्ट रोजी केळघर परिसरातील जंगल भागातही पोलिसांनी कारवाई केली. येथे ११ प्लास्टिक ड्रममध्ये सुमारे २,२०० लिटर गावठी हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन आढळून आले. त्याची अंदाजे किंमत १ लाख १५ हजार ५०० रुपये असून, हे रसायन व ड्रम घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. या प्रकरणी बेलवाडी येथील चंदा यशवंत झोरे (५०), ललिता काशिराम गोरे (४८) आणि रंजना बाबू गोरे (५१) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

याशिवाय धामनसई गावच्या हद्दीतही पोलिसांनी कारवाई करत उत्तम सुभाष शेवडे (५५) यांच्या घराच्या मागील बाजूस विक्रीसाठी ठेवलेली १०० लिटर गावठी दारू, अंदाजे किंमत १० हजार रुपये, हस्तगत केली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील कार्यवाही सुरू आहे.सलग केलेल्या या कारवायांमध्ये ४,७०० लिटर हातभट्टी दारू निर्मितीसाठी लागणारे रसायन आणि ११० लिटर तयार गावठी दारू, असा एकूण २ लाख ८२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या कारवाईत समोर आला आहे.

रोहा तालुक्यातील जंगल परिसराचा गैरफायदा घेत गावठी दारूच्या भट्ट्या सुरू ठेवणाऱ्यांविरोधात रोहा पोलिसांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. विशेषतः जंगलातील दुर्गम भागात सुरू असलेल्या हातभट्ट्यांवर थेट छापे टाकून मोठ्या प्रमाणात रसायन नष्ट केल्याने अवैध दारू निर्मिती करणाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे.

## बेपत्ता महिलेचा महाड पोलिसांकडून तपास सुरू

**महाड : प्रतिनिधी**



महाड तालुक्यातील पांगारी गावातून २६ वर्षीय महिला २०२१ मध्ये अचानक बेपत्ता झाली होती. ही घटना महाड तालुका पोलीस ठाणे अंतर्गत असून गेली पाच वर्षे या महिलेचा या पोलीस ठाण्याकडून शोध सुरू असून ही महिला अद्यापही सापडलेली नाही.

पोलिसांकडून दिलेल्या माहिती नुसार रजनी रणजीत मोरे रा. पांगरी महाड यांच्या फिर्यादीनुसार तालुक्यातील पांगरी गावातील राहणारी २६ वर्षीय महिला अपेक्षा प्रतीक मोरे ही ८/१२/२०२१ ला डॉक्टर कडे जाते असे घरातून सांगून निघून गेली अद्याप परतली नाही. गेली पाच वर्ष महाड तालुका पोलीस ठाण्याकडून या महिलेचा शोध सुरू आहे . सर्व नातेवाईकांकडे शोध घेण्यात आला, शोध पत्रिका प्रसिद्ध करण्यात आली गुप्त बातमीदारांकडून माहिती घेण्यात आली मात्र अद्यापही या महिलेचा तपास लागलेला नाही.

ज्यावेळी ही महिला बेपत्ता झाली त्यावेळी या महिलेच्या लग्नाला सहा महिने झाले होते.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे बारापाडा,** तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार **राजू गणी खाटीक उर्फ लांबतुरे** यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे बारापाडा,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ४५/३ | १ | ०-५४-९० | ०-०३-५० | ०-५८-४० पैकी ०-३३-४० | ६.५७ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१५** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्कः- ८८८८२७१७५९


## सुधा सरसगड महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या वास्तूचे भूमिपूजन

**पाली : प्रतिनिधी**



ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवून कृषी क्षेत्रात त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य सरकार आणि स्थानिक संस्थांच्या वतीने सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. याच दिशेने पडलेले एक ऐतिहासिक पाऊल म्हणून, सुधागड तालुक्यातील पेडली येथे 'सुधा सरसगड महिला शेतकरी उत्पादक कंपनी'च्या नियोजित वास्तूचा पायाभरणी व भूमिपूजन समारंभ नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) आणि पंचायत समिती सुधागड-पाली यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. हे भूमिपूजन खासदार सुनील तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली आणि प्रयत्नांतून साकार झाले असून, त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी सदैव पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले आहे.

कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषदेचे कृषी संवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांच्या पत्नी शर्मिला पाटील, पंचायत समितीच्या सभापती जागृती मानकर, उपसभापती संदेश शेवाळे, जिल्हा परिषद सदस्य शर्मिला बोडके, आणि पंचायत समिती सदस्य प्रणिता परदेशी यांनी प्रमुख उपस्थिती लावली. तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, उमेद अभियानाचे प्रतिनिधी आणि महिला शेतकरी उत्पादक कंपनीचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी उत्पादक कंपनी ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि कृषी क्षेत्राला बळ देण्यासाठी एक मैलाचा दगड ठरेल. महिला शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील राहू, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे करवले बुद्रुक, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन -**
**मौजेः करवले बुद्रुक, तालुका- पनवेल, जिल्हा - रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गटक्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर पॉ. | आकाराणी रू.पै |
|---|---|---|---|---|
| करवले बुद्रुक | १ शबाना अब्दुल गफुर पटेल<br>२ इलीयांस महंमद युसुफ पटेल<br>३ फरजाना अब्दुल गफुर पटेल<br>४ मुस्ताफ अहमद अब्दुला पटेल<br>५ शमी अब्दुल गफुर पटेल<br>६ शहबाज अब्दुल गफुर पटेल<br>७ सुफीयान अब्दुल गफुर पटेल<br>८ सोहेल अब्दुल गफुर पटेल<br>इतर अधिकारातील संबधित व्यक्तींची नावे<br>१ प्रदिप नामदेव पाटील व इतर सर्व राहनार तलोजा ता. पनवेल, जि. रायगड | ३७/१ | ०.७४.९०<br>०.११.६०<br>०.८६.५०<br>हे.आर.पॉ. | १२.१९ |
| | | एकुण | ०.८६.५० | |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिट्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीत न येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांकः २५/०८/२०२६**

**सही/-**
**ॲड. सरिता महेंद्र साखरे**
**पत्ता- बन्सल असोसिएट्स, पहिला मजला प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं.४ नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खाली तक्यात नमुद केलेली शेतजमिन मिळकती माझे अशिलांनी सदर मिळकतीचे मालक **जयश्री सतीश चौधरी, मिहीर सतीश चौधरी आणि तेजश्री जयदीप वाघ** यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे. माझे अशिल विकत घेत असलेल्या क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे.......

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- सागाव, ता. अंबरनाथ, जि. ठाणे**

| गट नं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|
| २८/१/अ | ०-७३-०० |
| २८/१/ब | ०-६७-०० पैकी वर नमूद इसमांचे मालकीचे ०-२७-०० एवढे क्षेत्र |
| २८/३ | २-४३-०० पैकी वर नमूद इसमांचे मालकीचे १-७१-०० एवढे क्षेत्र |
| २८/७/अ | १-५५-०० (मालक - मिहीर सतीश चौधरी) |
| २८/७/ब | १-५६-०० पैकी वर नमूद इसमांचे मालकीचे १-१३-०० एवढे क्षेत्र |
| २९/१/अ | ३-८७-०० (मालक मिहीर सतीश चौधरी) |
| २९/१/ब | ३-८६-०० |
| २९/३/ब | १-०७-०० |

याप्रमाणे वर नमुद मिळकत माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

तरी वर नमुद मिळकतीबाबत झालेल्या व्यवहारांस व मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाही व्यक्तीची/संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तकार, दंग, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गव्हाण, दान बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा हक्क, पोटगी, लिज, सबलिज, लिएन, सदर मिळकतीतुन जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **१४ (चौदा)** दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीविक्रीकरार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- २६/०८/२०२६**

**सही/-**
**ॲड. ज्ञानेश्वर श्रीनिवास कुळकर्णी**

कार्यालयीन पत्ता :- गाळा नं. १२५, पहिला मजला, महानगरपालिका शॉपीग कॉम्पेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, मोबाईल नं. ८०९७३९९३३१,
ई मेल आय.डी. dsk840@gmail.com


## खालापूर तालुक्यात दिव्यांग विद्यार्थ्यांना सहाय्यभूत साहित्याचे सभापतींच्या हस्ते वाटप

**चौक : प्रतिनिधी**

समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत खालापूर तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना आज विविध सहाय्यभूत साहित्याचे वाटप सभापती कृष्णा पारंगे, उप सभापती भाई शिंदे व गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा, शैक्षणिक प्रगती आणि पुनर्वसनास मदत व्हावी, या उद्देशाने व्हिल मेचेअर, TLM KIT तसेच थेरेपी मॅट आदी साहित्य विद्यार्थ्यांना देण्यात आले.विशेष शिक्षकांच्या मार्गदर्शन व सहकार्याने पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार साहित्याचे वाटप करण्यात आले. या सहाय्यभूत साहित्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपक्रमांमध्ये अधिक सक्रियपणे सहभागी होण्यास तसेच त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी करण्यास मदत होणार आहे.दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या अशा उपक्रमांमुळे "सर्वांसाठी शिक्षण आणि समान संधी" या उद्दिष्टाला निश्चितच बळ मिळत आहे. यावेळी पंचायत समिती सदस्य कमल भस्मा, प्रमिला पाटील, .देवयानी देशमुख, .अर्चना भोईर, समावेशीत शिक्षक, पालक उपस्थित होते.



### धाटाव जि.प. शाळेत शालेय साहित्याचे वाटप



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा विष्णू नगर धाटाव येथे २५ ऑगस्ट रोजी सेवा सहयोग फाउंडेशन व सिंडिकेट बँक यांच्या सहकार्याने इयत्ता पहिली ते पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय किट्स( उपयुक्त सर्व साहित्य) चे वाटप करण्यात आले आहे.

यावेळी अमर सलागरे,वैशाली सलागरे, ज्ञानेश्वर जाधव, अनिकेत पाशिलकर, उमेश काळे, धनंजय रटाटे, धाटाव केंद्राचे केंद्रप्रमुखनारायण गायकर, शाळेच्या मुख्याध्यापिका. सुजाता वरणकर, शिक्षिका.तन्वी गुरव, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य.कल्पना मोरे आदी उपस्थित होत्या.


### नावात बदल

माझे पूर्वीचे नाव TAMIM AHMED MUNIR JAMADAR असे होते. प्रतिज्ञापत्राद्वारे नावात दुरुस्त केल्यानंतर माझे नाव TAMIM MUNIR JAMADAR यााप्रमाणे असणार आहे.

प्रतिज्ञापत्र नं :- २६५२०४१८४१२६८६००१०२१०९
दिनांक :- २१-८-२६



### पाहिजेत

DIPLOMA IN CIVIL / ELECTRICAL / MECHANICAL ENGINEERS
ONLY FRESHERS - 2026 PASS OUT
**SEND YOUR CV TO -**
prathamesh.kamble@adani.com

# महापेत दूध भेसळीचा पर्दाफाश

## ४,७१० लिटर साठा जप्त







**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील महापे एमआयडीसी परिसरातून दूध भेसळ करून ते ठाणे आणि नवी मुंबईतील विविध डेअऱ्यांना पुरविले जात असल्याचा प्रकार अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) कारवाईत उघडकीस आला आहे. दूध टँकरमध्ये स्किम्ड मिल्क पावडर आणि थंड पाणी मिसळले जात असल्याचे आढळल्यानंतर प्रशासनाने ४,७१० लिटर भेसळयुक्त व संशयित दूध जप्त करून नष्ट केले.

१९ ऑगस्टला मिळालेल्या गोपनीय माहितीनंतर ठाणे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने महापे येथील मे. पी. के. डेअरीवर छापा टाकला. यावेळी दूध टँकरमध्ये पाकिटांमधील स्किम्ड मिल्क पावडर आणि चिलरमधील थंड पाणी मिसळले जात असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. एक किलो स्किम्ड मिल्क पावडरमध्ये आठ ते दहा लिटर पाणी मिसळले जात असल्याचा प्रशासनाचा दावा आहे. हे मिश्रण गायी-म्हशीचे दूध म्हणून विविध डेअऱ्यांना पुरविले जात असल्याचे तपासात समोर आले. या कारवाईचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले होते.

दक्षता विभागाच्या सहआयुक्त प्रीती टिपरे आणि ठाण्याचे अन्न सहआयुक्त सचिन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. कोकण विभागाचे सहआयुक्त (अन्न) अजित मैत्रे, अन्न सुरक्षा अधिकारी विक्रम निकम, प्रशांत पवार, उत्तरेश्वर बडे आणि माणिक जाधव तसेच गुप्तवार्ता पथक कारवाईत सहभागी होते. या कारवाईत ४,७१० लिटर दूध जप्त करण्यात आले असून त्याची किंमत सुमारे एक लाख ८५ हजार ७८० रुपये आहे. याशिवाय १२९.५ किलो पनीर, ४७३ किलो स्किम्ड मिल्क पावडर आणि ८८.४ किलो क्रीमचा साठाही ताब्यात घेण्यात आला.

पी. के. डेअरीतील ३९३ लिटर म्हशीचे आणि ३६८ लिटर गायीचे असे ७६१ लिटर दूध जागेवरच नष्ट करण्यात आले. महापे येथील भास्कर डेअरीकडून ५४८ किलो संशयित पावडर व पनीर जप्त करून तिचा परवाना निलंबित करण्यात आला. रबाळे येथील नारायण डेअरीमध्ये प्रयोगशाळा अहवाल नसलेले ३,६४८ लिटर पाश्चराईज्ड स्किम्ड दूध आढळल्याने तेही नष्ट करण्यात आले. फत्तेसिंगराव नाईक सहकारी दूध संघाकडील क्रीमचा साठाही जप्त करण्यात आला. पी. के. डेअरीकडे अन्न सुरक्षा परवाना नसल्याचे आढळल्याने तिचा व्यवसाय बंद करण्यात आला.

# वादळी वाऱ्यामुळे मासेमारी ठप्प; बोटी बंदरातच!



**उरण : प्रतिनिधी**

मासेमारीचा नवा हंगाम सुरू होऊन केवळ आठवडा लोटला आहे, मात्र खोल समुद्रात वादळी वारे वाहू लागल्याने बोटींनी कोकणातील विविध बंदरांत नांगर टाकले आहेत. त्यामुळे मासेमारी व्यवसायाला तात्पुरता फटका बसला असून मच्छीमारांनी सुरक्षिततेच्या कारणास्तव बोटी किनाऱ्यावरच उभ्या केल्या आहेत.

हवामान अंदाजानुसार लवकरच वातावरण निवळून बोटी समुद्रात जातील, अशी आशा आहे. सध्या रायगडमधील काही मासेमारी बोटी जयगडच्या किनाऱ्यावर नांगरण्यात आल्या, तर करंजा बंदरातील बहुतांश बोटी बंदरातच थांबल्या आहेत. मच्छीमारांच्या सुरक्षेसाठी मत्स्यव्यवसाय विभागाने धोक्याचा इशारा देणारे पत्र दिले आहे, अशी माहिती मत्स्यव्यवसाय विभाग रायगड जिल्ह्याचे सहआयुक्त जलील पटेल यांनी दिली.

मासेमारीला शेतीचा दर्जा मिळाला असूनही मासळीच्या उत्पादनात चढ-उतार येत असल्याने मच्छीमारांना आर्थिक नियोजन करावे लागत आहे. हंगामाच्या सुरुवातीलाच वातावरण बिघडल्याने चिंता वाढली असली तरी पुढील काही दिवसांत परिस्थिती सुधारेल, असा विश्वास मच्छीमार व्यक्त करत आहेत. लवकरच डिझेल कोटा मंजूर व्हावा, अशी मागणी मच्छीमारांनी केली आहे.

खोल समुद्रातील वाऱ्याचा वेग कमी झाल्यानंतर पुन्हा मासेमारीला वेग येणार असून बाजारपेठेत ताज्या माशांची आवक सुरळीत होईल, अशी अपेक्षा आहे, असे व्यावसायिक विनायक पाटील यांनी सांगितले.

# नवी मुंबईत २.७१ लाख आयुष्मान कार्डांचे वाटप



**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत पात्र कुटुंबांना दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार दिले जात असून नवी मुंबई महापालिका क्षेत्रात आतापर्यंत २,७१,८०९ नागरिकांची आयुष्मान कार्डे तयार करण्यात आली आहेत. उर्वरित पात्र लाभार्थ्यांनी आपले कार्ड तातडीने काढून घ्यावे, असे आवाहन महापालिका आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

या योजनेंतर्गत गंभीर आजार, शस्त्रक्रिया आणि रुग्णालयात भरती असताना होणारा सर्व खर्च समाविष्ट आहे. या योजनेचा लाभ घेण्याकरिता आयुष्मान कार्ड असणे गरजेचे असून आयुष्मान कार्ड काढण्यासाठी लाभार्थीचे ऑनलाईन रेशन कार्ड असणे अनिवार्य आहे. तसेच हे ऑनलाईन रेशन कार्ड अद्ययावत आधार व मोबाइल क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे. नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाकडून आयुष्मान कार्ड निर्माण करण्यासाठी महापालिका कार्यक्षेत्रामध्ये वेळोवेळी शिबिरांचे आयोजन करण्यात येत असते.

महापालिका आरोग्य विभागामार्फत २,७१,८०९ इतक्या लोकसंख्येची आयुष्मान कार्डे निर्माण करण्यात आली आहेत. पात्र लाभार्थी नागरिकांना आपल्या जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तसेच रेशनिंग दुकानामध्ये किंवा जवळच्या ई-सेवा सुविधा केंद्रामध्ये आपले आयुष्मान कार्ड बनवून घेता येईल. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपले आयुष्मान कार्ड निर्माण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे. आयुष्मान कार्डधारक लाभार्थ्यांना प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा लाभ अंगीकृत शासकीय किंवा खासगी रुग्णालयात घेता येतो.

उपचार किंवा शस्त्रक्रियेकरिता अंगीकृत रुग्णालयात दाखल होतेवेळी अंगीकृत रुग्णालयातील आरोग्यमित्र/आरोग्य मैत्रीण यांना संपर्क करून आयुष्मान कार्डद्वारे योजनेंतर्गत नोंदणी करणे गरजेचे आहे. नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक रुग्णालय वाशी, ऐरोली व नेरूळ तसेच माताबाल रुग्णालये तुर्भे, बेलापूर अशी महापालिका रुग्णालये योजनेसाठी अंगीकृत असून इतर खासगी रुग्णालयेही या योजनेंतर्गत अंगीकृत करण्यात आली आहेत.

अंगीकृत रुग्णालयांमध्ये महात्मा गांधी मिशन ट्रस्ट हॉस्पिटल सीबीडी, अजयन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल कोपरखैरणे, आर. एन. पाटील सुरज हॉस्पिटल सानपाडा, श्री हॉस्पिटल सेक्टर १७ वाशी, क्रिटीकेअर आयसीयू अँड सुपरस्पेशालिटी सेंटर सेक्टर १६ ऐरोली, डिवाइन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर घणसोली, साई स्नेहदीप हॉस्पिटल कोपरखैरणे सेक्टर २०, सुयश हॉस्पिटल सेक्टर ४० करावे नेरूळ, इंद्रावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर घणसोली, न्यू मानक हेल्थकेअर हॉस्पिटल नेरूळ, तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल नेरूळ, महात्मा गांधी मिशन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर सेक्टर ३० वाशी, महाजन हॉस्पिटल रबाळे, लायन सर्व्हिस सेंटर ट्रस्ट हॉस्पिटल कोपरखैरणे, मंगल प्रभू नर्सिंग होम सानपाडा, सनशाइन हॉस्पिटल नेरूळ, इंद्रावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर ऐरोली, एमपीसीटी हॉस्पिटल सानपाडा, क्रिडेन्स केअर हॉस्पिटल घणसोली, मयुरेश हॉस्पिटल वाशी, एम. जे. माधव सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल वाशी, अपेक्स किडनी डायलिसिस हॉस्पिटल सेक्टर ३० वाशी, इंडियन बर्न्स हॉस्पिटल ऐरोली, एमजीएम हॉस्पिटल वाशी, श्रुषशा हार्ट केअर सेंटर अँड स्पेशालिटी हॉस्पिटल नेरूळ, डी. वाय. पाटील हॉस्पिटल रिसर्च सेंटर नेरूळ, पंजाब केसरी चॅरिटेबल ट्रस्ट जनरल हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर वाशी, रामकृष्ण नेत्रालय हॉस्पिटल वाशी यांचा समावेश आहे.

अंगीकृत रुग्णालयामध्ये उपलब्ध असलेल्या वैद्यकीय तज्ज्ञ सेवासुविधेप्रमाणे योजनेंतर्गत दाखल झाल्यास लाभ घेता येतो. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार अंगीकृत रुग्णालयात उपचार अथवा शस्त्रक्रियेकरिता दाखल झाल्यास एखाद्या लाभार्थीकडे आयुष्मान कार्ड नसल्यासही योजनेंतर्गत लाभ घेता येतो. त्याकरिता अंगीकृत रुग्णालयात दाखल होतेवेळी रुग्णालयातील आरोग्यमित्र, आरोग्य मैत्रीण यांच्याशी संपर्क साधून रेशनकार्ड व आधारकार्डची छायांकित प्रत सादर करावी, जेणेकरून त्वरित आयुष्मान कार्ड निर्माण करता येईल व योजनेचा लाभ घेता येईल. त्याचप्रमाणे रेशनकार्ड उपलब्ध नसल्यास संबंधित तहसीलदार कार्यालयातून शासनाने ठरवून दिलेल्या विहित नमुन्यातील तहसीलदार प्रमाणपत्र अंगीकृत रुग्णालयातील आरोग्यमित्र, आरोग्य मैत्रीण यांना सादर करावे, जेणेकरून आयुष्मान कार्ड निर्माण करणे शक्य होईल व योजनेंतर्गत लाभ घेता येईल.

# कोपरखैरणेतील वाहतूक समस्येप्रकरणी नगरसेविका सायली शिंदे यांचा पुढाकार

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

वर्षानुवर्षे कोपरखैरणेवासीय वाहन पार्किंग आणि वाहतूक कोंडीने त्रस्त आहेत. स्थानिक वाहतूक पोलीस यंत्रणेचे प्रयत्न अपयशी ठरले आहेत. यावर भाजपच्या स्थानिक नगरसेविका व विधी समिती सभापती सायली शिंदे यांनी पुढाकार घेत स्थानिक वाहतूक शाखेला निवेदन देत सोमवारी प्रमुख रस्त्यांची वाहतूक अधिकाऱ्यांसोबत पाहणी केली.

कोपरखैरणे विभागातील कोपरखैरणे स्टेशन रोड, वॉर्ड ऑफिस, सेक्टर ४ रस्ता, डी-मार्ट चौक, सेक्टर १५, तीन टाकी तसेच परिसरातील वर्दळीच्या प्रमुख मार्गांवरील अनधिकृत पार्किंग, वाहतूक कोंडीने रहिवासी नाहक त्रस्त झाले आहेत. विभागातील स्टेशन रोड तर सायंकाळी प्रवासासाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. या आणि यांसारख्या अनेक समस्या रहिवासी निमूटपणे सहन करीत आहेत. या समस्यांवर तात्पुरती नाही, तर कायमस्वरूपी उपाययोजना होणे काळाची गरज आहे. या समस्यांचे निवेदन वाहतूक निरीक्षक योगेश शिंदे यांना देण्यात आले.

दरम्यान, स्थानिक नगरसेविका सायली शिंदे यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने आम्ही २५ ते ३० वाहनांवर कारवाई केली असून सदर विभाग समस्यामुक्त करण्यासाठी आमचे प्रयत्न असतील, असे कोपरखैरणे वाहतूक शाखा वपोनि. योगेश शिंदे यांनी सांगितले.



# ४०० वर्षांपूर्वीचे पुरातन स्वयंभू माणकेश्वर मंदिर



उरण शहराच्या पश्चिमेस केगाव ग्रामपंचायत हद्दीत गर्द हिरव्या झाडीत, निसर्गाच्या सान्निध्यात असलेले माणकेश्वर मंदिर ४०० वर्षांपूर्वीचे पुरातन स्वयंभू मंदिर आहे. मंदिरात महाशिवरात्री, त्रिपुरारी पौर्णिमा यात्रा व श्रावण महिन्याच्या चार सोमवारी उत्सव साजरा केला जातो. श्रावण महिन्यात प्रत्येक सोमवारी भक्तांची दर्शनासाठी मोठी गर्दी असते.

पहाटेपासूनच दर्शनासाठी रांग लागलेली असते. सुमारे २५०० ते ३५०० भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात. दानशूर व्यक्तींकडून सहकार्य मिळत असते.पहिल्या श्रावणी सोमवारी शंकरशेठ तांडेल, दुसऱ्या सोमवारी दर्शन म्हात्रे, तिसऱ्या सोमवारी बाजारपूर ग्रामस्थ व चौथ्या सोमवारी नवीन राजपाल यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले जाते. समुद्रकिनारी असल्याने पर्यटक येत असतात. प्रत्येक श्रावणी सोमवारी मंदिरासमोर पूजेच्या सामानाची दुकाने थाटण्यात येतात, त्यात बेल, दूध, हार, नारळ यांची दुकाने असतात. मंदिराचे अध्यक्ष/सचिव दिगंबर म्हात्रे व स्वयंसेवक व भाविक यांच्या सहकार्याने कार्यक्रम साजरे केले जातात.

मोरा सागरी पोलीस स्टेशन, वाहतूक विभाग व केगाव ग्रामपंचायत यांचे सहकार्य मिळत आहे. एक शेतकरी शेत नांगरताना नांगराच्या फाळाला रक्त लागलेले दिसले. तिथे उत्खनन केले असता अर्धे तुटलेले शिवलिंग सापडले. कै. शरद म्हात्रे व कै. हरिभाऊ यांच्या पूर्वजांनी तेव्हा सदर शिवलिंगाची स्थापना करून माणकेश्वर मंदिर बांधले. १९९९ साली नवीन मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली.

**-संकलन दिनेश पवार**



# छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना जागतिक व्यासपीठ



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शेडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठाच्या अभियांत्रिकी संकायासाठी अभिमानास्पद उपलब्धी ठरली असून विद्यापीठातील IEEE विद्यार्थी शाखेच्या स्थापनेला IEEEकडून अधिकृत मान्यता मिळाली आहे. या मान्यतेमुळे विद्यार्थ्यांना जागतिक तांत्रिक व संशोधन समुदायाशी जोडले जाण्याची संधी मिळणार आहे.

IEEE विद्यार्थी शाखेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तांत्रिक परिसंवाद, तज्ज्ञ व्याख्याने, कार्यशाळा, संशोधन प्रकल्प, तांत्रिक स्पर्धा तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांमध्ये सहभागी होता येणार आहे. आपल्या कल्पनांचे संशोधनात आणि संशोधनाचे नवोपक्रमात रूपांतर करण्यासाठी विद्यार्थ्यांना हे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. IEEE विद्यार्थी शाखेचे ब्रांच काउन्सेलर विकास कुमार यांनी या प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने आणि समर्पणाने योगदान दिल्याचे सांगितले.

विद्यार्थ्यांच्या वतीने महक सैनी यांनी पेटिशनर म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.कुलसचिव आर. पी. शर्मा, कुलगुरू केशरी लाल वर्मा आणि अध्यक्ष केशव बढ़ाया यांनी या उपलब्धीबद्दल विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान, संशोधन आणि नवोपक्रमाशी जोडण्यासाठी IEEE विद्यार्थी शाखा महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या शाखेमुळे विद्यार्थ्यांना देश-विदेशातील वैज्ञानिक, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ आणि तांत्रिक तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळणार असून विद्यापीठातील संशोधन आणि नवोपक्रमाची संस्कृती अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे. ही केवळ विद्यार्थी शाखेची सुरुवात नाही, तर अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या कल्पना, प्रतिभा आणि स्वप्नांना जागतिक तांत्रिक व्यासपीठावर भरारी देणाऱ्या नव्या पर्वाची सुरुवात आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात औषध जागरूकता उपक्रम



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे येथे स्टाफ अकॅडमीचे उद्घाटन प्र. प्राचार्य आमोद ठक्कर यांच्या औषध घेण्यापूर्वी या विषयावरील व्याख्यानाने २५ ऑगस्ट रोजी झाले. आजकाल साध्या आजारावर अनेक औषधे सहजपणे मेडिकलमध्ये मिळतात, मात्र डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेतल्यास आरोग्यावर परिणाम संभवतो. म्हणून औषधे घेताना आपले व आपल्या कुटुंबीयांच्या आरोग्याचे महत्त्व लक्षात घेता प्रत्येकाने योग्य ती काळजी घेणे गरजेचे असल्याचे मत प्र. प्राचार्य आमोद ठक्कर यांनी व्यक्त केले.

पुढे बोलताना त्यांनी औषधे घेताना काय काळजी घ्यावी, औषधे दिलेल्या वेळेला दिलेल्या पद्धतीनेच घेतली पाहिजेत, औषधे घरात व्यवस्थित कशी ठेवावीत, औषधांचा साइड इफेक्ट कसा ओळखावा, झोपेचा पॅटर्न, खाण्याच्या पद्धती, दिनचर्या, ॲसिडिटीची कारणे व प्रकार व प्रतिबंध तसेच अँटिबायोटिक औषधे दुसऱ्यांना लागू पडलेली औषधे तुम्हाला लागू पडतीलच असे नाही. त्यांच्या आणि तुमच्या आजारांची कारणे वेगवेगळी असू शकतात. स्वतःहून घेतलेली औषधे एक ते दोन डोसच्या वर घेऊ नयेत, डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्टाफ अकॅडमी समितीचे चेअरमन व उपप्राचार्य संदीप घोडके यांनी प्रास्ताविकामध्ये स्टाफ अकॅडमी समितीचा उद्देश विशद केला. राहुल पाटील यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. आभार प्रदर्शन योगेश कुलकर्णी यांनी, तर सूत्रसंचालन सुजाता पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अंकिता राठोड यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

राम प्रहर

## श्रावणधारा

### श्रावण रंग

श्रावण सृष्टीला रंग रूपाचे वरदान
श्रावण एक वृत्ती आहे स्थायी चराचरांत।

भूमीला गहिवर फुटे हिरवी तृणपात
आसुसलेली धरा नद्या नाले करी संतृप्त
आनंद वृत्ती प्रसवते सृष्टीच्या गात्रांतून।

आहे रंगबावरा नाद गहिरा गंधभारीत
श्रावण संस्कृती दर्शवी प्रेम रंगांचे सृजन
विविध रंगांचा कल्लोळ करितो उधळण।

हिरवीकंच झाडे वेली सुमने डवरतात
उगवती तृणांकुर डोंगरदऱ्या कपाऱ्यांत
मिळतो हरखून टाकणारा गंध सुगंध।

श्रावण उर्मी अलवार ओढ करी बेभान
आगमनाने वाटे निसर्ग त्याचे अंकित
मनुष्य पशु पक्ष्यांना देई नेत्र सुख आनंद।

चित्रकार कवी कल्पनांना करी प्रोत्साहित
गायक वादक कलासक्तांना करी मोदीत
श्रावणाची आस मोहिनी राहे चिरंतन।

श्रावण धर्म आहे त्याला आनंदाचे परिमाण
या हृदयीचा त्या हृदयी साधलेला संवाद
सणांचा महिना देवपूजेने मिळे आनंद।



-अरुण गांगल,
कर्जत

# वरवठणे जि.प. शाळेत ४२ विद्यार्थ्यांसाठी एकच शिक्षिका; शैक्षणिक भवितव्यावर परिणाम

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील रायगड जिल्हा परिषद शाळा, वरवठणे येथे इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत तब्बल ४२ विद्यार्थी शिक्षण घेत असताना संपूर्ण शाळेसाठी केवळ एकच शिक्षिका कार्यरत असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षकांची संख्या अपुरी असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असून, शाळेत किमान दोन शिक्षक कायमस्वरूपी नियुक्त करावेत, अशी जोरदार मागणी पालकवर्गाने केली आहे.

मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता वरवठणे येथील जिल्हा परिषद शाळेत पालकवर्ग एकत्र आले. यावेळी त्यांनी शाळेतील वस्तुस्थिती पत्रकारांच्या निदर्शनास आणून देत प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त केली. यावेळी वरवठणेचे माजी सरपंच गणपतशेठ म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते संतोष बैकर, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष भगवान राणे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा तृप्ती म्हात्रे, अश्विनी म्हात्रे, प्रणिता म्हात्रे यांच्यासह मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.



दरम्यान, वरवठणे ग्रामपंचायत सदस्य गणपत लक्ष्मण म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा तृप्ती म्हात्रे, उपाध्यक्षा प्रणिता म्हात्रे, लतिका शेडगे व निकिता वारगे यांनी रोहा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अतुल जगताप यांची भेट घेऊन शाळेतील शिक्षकांची समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी कायमस्वरूपी आणखी एक शिक्षक तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**आणखी एक शिक्षक मिळणार**

दरम्यान, गटशिक्षणाधिकारी अतुल जगताप यांनी शिक्षकांची कमतरता असल्याचे सांगत, येत्या ५ सप्टेंबर रोजी शिक्षक भरती झाल्यानंतर वरवठणे शाळेला आणखी एक शिक्षक देण्यात येईल, असे सांगितले. त्यामुळे पालकवर्गामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## रिस येथे १३ वर्षीय मुलाची गळफास घेऊन आत्महत्या

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रिस येथील महालक्ष्मी रुबी बिल्डिंगमध्ये एका १३ वर्षीय मुलाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्रज्वल रणजीत पाटील असे मृत मुलाचे नाव आहे. घटनेनंतर कुटुंबीयांनी त्याला तातडीने उपचारासाठी मोहोपाडा येथील पल्स हॉस्पिटलमध्ये नेले. त्यानंतर वैद्यकीय सल्ल्यानुसार रिस येथील निरामय हॉस्पिटल आणि पुढे चौक येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, मात्र वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी प्रज्वलला मृत घोषित केले.

प्रज्वलचे वडील रणजीत पाटील हे पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील व्हॅनबेरी कंपनीत नोकरीस आहेत. अवघ्या १३ वर्षांच्या मुलाचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने पाटील कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

घटनेची माहिती मिळताच रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव तसेच पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर पुढील तपास करीत आहेत.

अल्पवयीन मुलांच्या वर्तनातील बदल, तणाव किंवा भावनिक अडचणींकडे पालक, शिक्षक आणि कुटुंबीयांनी गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. मुलांना कोणतीही अडचण किंवा चिंता असल्यास त्यांच्याशी शांतपणे संवाद साधून त्यांना विश्वास देणे गरजेचे आहे. मुलांनीही अडचणीच्या प्रसंगी पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तीशी मनमोकळेपणाने बोलावे, हा संदेश या दुर्दैवी घटनेतून पुढे येत आहे.

# आदर्श पतसंस्थेचे नाव आता सुरेश पाटील आदर्श अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या नावात सुरेश पाटील आदर्श अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड असा बदल करण्याचा ठराव आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला.





आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि. २२) पी. एन. पी . नाट्यगृह चेंढरे येथे आयोजित करण्यात आली. आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजीत सुरेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा घेण्यात आली. या सभेत आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या नावात बदल करून पतसंस्थेचे नाव सुरेश पाटील आदर्श अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड असे करण्याचा ठराव संचालक ॲड. आत्माराम काटकर यांनी या सभेत मांडला. तो एकमताने मंजूर करण्यात आला. यावेळी उपस्थित सभासदांनी टाळ्यांचा कडकडाट करून या ठरावाचे स्वागत केले.

आदर्श पतसंस्थेच्या रायगड जिल्ह्यातील नियोजित माणगाव येथील शाखेसाठी व पुणे - वारजे येथील शाखेसाठी जागा खरेदी करण्याचा ठराव देखील या सभेतच मंजूर करण्यात आला.

आदर्शचे ५८ हजार ८८६ सभासद आहेत.रु. ५९६ कोटी ८८ लाख ठेवी आहेत. रु. ४६० कोटी ७३ लाख रूपये कर्ज आहे. एकत्रीत व्यवसाय रु. १०५७ कोटी ६१ लाख रूपये आहे. ढोबळ नफा रु. १५ कोटी ४१ लाख रूपये झाला आहे. ३७ टयांनी ठेवी वाढल्या आहेत. ४५ टयांनी कर्ज वाढ झाली आहे. आदर्शची आर्थिक परिस्थिती भक्कम आहे, अशी माहिती आदर्शचे अध्यक्ष अभिजीत सुरेश पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात दिली.

मागील एका वर्षात रु. ३०४ कोटी रुपयांची विक्रमी व्यवसाय वाढ केली . अशी कामगिरी करणारी राज्यातील पहिली संस्था होण्याचा मान आदर्शला मिळाला . सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात १५०० कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसाय तर पुढील दोन वर्षात २५०० कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसाय करण्याचा मानस आहे, असे आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांनी यावेळी जाहीर केले.

सभेपूर्वी सभासदांसाठी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. आदर्श पतसंस्थेचे सल्लागार व बँकिंग तज्ञ नितीन वाणी सर यांनी उपस्थित सभासदांना त्यांची कर्तव्य , जबाबदारी , हक्क याबाबत मार्गदर्शन केले. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपजी नाईक हे सभेसाठी प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित होते , त्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात नाईक साहेबांनी आदर्श चा पाया कसा भक्कम आहे व संस्थापक श्री सुरेश पाटील यांनी लावलेले रोप त्यांचा मुलगा अभिजीत पाटील तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कसे वाढवत आहे याची माहिती दिली .

सभेच्या सुरूवातीला देशा साठी शहीद झालेले जवान सुयोग अशोक कांबळे मू. नारंगी यांच्या वीरपत्नी श्रीमती निशा सुयोग कांबळे यांचा ऋणनिर्देष म्हणून शाल ,श्रीफळ व रु. ५१०००/- चा धनादेश देऊन सन्मान करण्यात आला ,

तसेच वाघ्रण येथील कौस्तुभ मेहुल पाटील याची हवाई दलात लढाऊ विमान वैमानिक म्हणून नियुक्ती झाल्या बद्दल संस्थेकडून सन्मान करण्यात आला , कौस्तुभ सध्या आपल्या कर्तव्यावर रुजू असल्याने सदरचा सन्मान त्याच्या वतीने त्याचे वडील मेहुल पाटील यांनी स्वीकारला .

यानंतर शास्त्रज्ञ व सभासद श्री प्रदीप ताम्हाणे सर यांचा व पुणे येथून सभेसाठी उपस्थित असलेले सभासद यांचा सत्कार करण्यात आला , यानंतर संस्थेचे कर्मचारी ऋतुराज पाटील ,रेश्मा पाटील , निखिल पाटील , ग्रीष्मा सातामकर , ऐश्वर्या पाटील यांनी कस्टमर सर्विस बँकिंग कोड अँड स्टँडर्ड या परीक्षेत उत्तीर्ण झाल्या बद्दल व रेश्मा पाटील व प्रियांका वाळंज या एलएलबी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे सत्कार करण्यात आले .

# पेणमध्ये डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृतिदिनानिमित्त विविध स्पर्धा

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा पेणतर्फे 20 ऑगस्ट रोजी हुतात्मा डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती दिनानिमित्त भव्य जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व, रील आणि पोस्टर या तीनही प्रकारच्या स्पर्धांना संपूर्ण जिल्ह्यातून विद्यार्थ्यांचा आणि युवा वर्गाचा भरभरून प्रतिसाद मिळाला.





कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध चित्रपट गीतकार, कवी व अभिनेते डॉ. विनायक पवार उपस्थित होते. त्यांच्यासोबत व्यासपीठावर प्रा. डॉ. शेख आणि मीना मोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. गुणवंत स्पर्धकांची निवड करण्यासाठी सावनी गोडबोले, एन. जे. पाटील (पोस्टर स्पर्धा), जगदीश डंगर, विशाल चांदोरकर (रील स्पर्धा) आणि अजय भोईर व नंदकिशोर परब (वक्तृत्व स्पर्धा) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

या वेळी घेण्यात आलेल्या रील स्पर्धेत प्रथमः डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, पेण, द्वितीयः जयेश जगन्नाथ मोरे (अलिबाग), तृतीयः रा.जि.प. शाळा वडमाळवाडी, (पेण), उत्तेजनार्थः अमित निंबाळकर (पाली)पोस्टर स्पर्धाः प्रथमः आरोही स्वप्नील पिंगळे (सौ. म. ना. नेने कन्या विद्यालय), द्वितीयः सिद्धी विजय पाटील (ब. ग. ठाकूर विद्यालय), तृतीयः ध्रुवीका देवानंद कुडमेथे, वक्तृत्व स्पर्धाः प्रथमः प्राजक्ता सागवेकर, द्वितीयः आर्या दिलीप जोजे, तृतीयः ईश्वरी विवेक सावंत यांनी यश संपादन केले.

या जिल्हास्तरीय स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रमाकांत घरत, योगिता डंगर, नंदकिशोर परब आणि जगदीश डंगर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी संदेश गायकवाड यांनी सर्व स्पर्धकांचे व उपस्थितांचे आभार मानले.

## ईद सणानिमित्त तळा येथे पथसंचलन

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरात शनिवार दि,२२ऑगस्ट रोजी येणाऱ्या ईद -ए-मिलाद सणाच्या अनुषंगाने तळा पोलीस ठाणे हद्दीत शहरात नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्या करीता व कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व शांतता टिकून राहावी याकरिता पथसंचलन (रूट मार्च) काढण्यात आले होते.

सदर पथसंचलन (रूट मार्च) शहरातील चंडिका नाका- बळीचा नाका- मुळे नाका - कासार आळी - वरचा मोहल्ला - खालचा मोहल्ला - तळा मुख्य बाजारपेठ - बळीचा नाका - चंडिका नाका - असा काढण्यात आला होता. या पथसंचलनामधे तळा पोलीस ठाणे कडील १ अधिकारी ६ अंमलदार तसेच RCP माणगाव लाटूनचे अधि १+२० जवान असे सहभागी झाले होते.



# श्रीवर्धनमधील जावेळे गावातील बेलेश्वर शिवमंदिर



### भाविकांच्या श्रद्धेचे ठिकाण

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन हरिहरेश्वर मार्गावरती गालसुरे गावापासून धारवली-आडी कडे जाणाऱ्या मार्गावरती जावेळे गाव आहे. गावाच्या आजूबाजूचा परिसर हिरव्या झाडीने नटलेला असून, त्या ठिकाणी बेलेश्वर शिवमंदिर हे स्वयंभू मंदिर आहे. मंदिराचा परिसर अतिशय निसर्गरम्य असून त्या ठिकाणाहून वाहणारी एक छोटीशी नदी, त्या परिसरात असलेली अनेक बेलाची झाडे यामुळे या ठिकाणी आल्यानंतर मन खूप प्रसन्न होते.

या मंदिरा बद्दल एक विशेष आख्यायिका सांगितली जाते जावेळे गावातील एक गुराखी रोज आपल्या गाई चारण्यासाठी रानात घेऊन जात असे. त्यातील एक गाय मंदिराच्या परिसरात रोज जात असे व त्या ठिकाणी तिला पान्हा फुटल्यानंतर ती दुग्धाभिषेक करत असे. गुराख्यांनी एक दिवस गायीच्या मागे जाऊन पाहिले की गाय त्या ठिकाणी जाऊन काय करते तर गाईच्या अचुळातून एका ठिकाणावरती दुग्धाभिषेक होताना पाहायला मिळाला. त्यानंतर ग्रामस्थांनी त्या ठिकाणी खोदकाम केले. त्यावेळी त्या ठिकाणी बेलेश्वराचे लिंग व नंदीची मूर्ती सापडली. त्यानंतर गावकऱ्यांनी कुडाचे मंदिर त्या ठिकाणी बांधले.

साधारण 80 ते 90 वर्षांपूर्वी श्रीवर्धन शहरातील सुपारीचे व्यापारी द्वारकानाथ तथा बंधुशेठ गंद्रे यांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला. त्यानंतर श्रीवर्धन तालुक्यात आलेल्या चक्रीवादळानंतर मंदिराच्या छताचे थोड्याफार प्रमाणात नुकसान झाले होते. त्यानंतर ग्रामस्थांनी पुन्हा एकदा मंदिराचा जिर्णोद्धार केला व आता आरसीसी चे सुंदर मंदिर बांधण्यात आलेले आहे. मंदिराच्या बाहेर एक छोटेसे काळभैरवाचे मंदिर देखील आहे. ही मूर्ती देखील त्या ठिकाणी उत्खनन केल्यानंतर सापडली होती. या काळभैरवाच्या मंदिरात जिवंत नागाचे दर्शन दर श्रावणी सोमवारी अनेकांना होते.

श्रावणी सोमवारी अनेक भाविक दर्शनासाठी या मंदिरामध्ये येत असतात. याव्यतिरिक्त महाशिवरात्री उत्सव देखील या ठिकाणी मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. अनेक भाविक ब्रह्मवृंदाकडून लघुरुद्रासारखे विधी देखील मंदिरामध्ये करून घेतात. आज दुसरा श्रावणी सोमवार असल्यामुळे मंदिरात भाविकांची खूप मोठ्या प्रमाणात गर्दी होती.तसेच विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

# दुर्गम भागातील शाळेत विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या कोठिंबे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील १५५ विद्यार्थ्यांना कर्जत-नेरळ कन्झ्युमर प्रोडक्ट्स डिस्ट्रिब्यूटर्स असोसिएशन यांच्या 14व्या वर्धापन दिनानिमित्त शालेय गणवेशांचे वाटप करण्यात आले.





कोठिंबे येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापक छगन मेंगाळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. याप्रसंगी असोसिएशनचे अध्यक्ष राकेश परमार, सचिव मयूर ओसवाल, खजिनदार रवींद्र हिंगड, विशाल शाह, किशोर जाधव, यशवंत घरत, सुरेश ओसवाल, आनंद गायकवाड, शुभांगी देशमुख, राजेश जाधव आदी उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व खाऊचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी मयूर बोलतांना ओसवाल यांनी, आम्ही गेली चौदा वर्षे विविध उपक्रम राबवून दुर्गम, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना व शाळांना सहकार्य करीत असतो, असे स्पष्ट केले.

छगन मेंगाळ यांनी, कर्जत-नेरळ कन्झ्युमर प्रोडक्ट्स डिस्ट्रिब्यूटर्स असोसिएशन' ,समाजातील दानशूर व्यक्ती किंवा संस्था विविध प्रकारे मदत करीत असल्याने आम्हाला विद्यार्थ्यांना अधिक सुविधा देणे शक्य होते. असेच सहकार्य आपण करीत रहावे, अशी विनंती केली.

# कोलंबो कसोटीत श्रीलंका पिछाडीवर

## भारताविरुद्ध तिसऱ्या दिवसअखेर आठ बाद २६५ धावा



**कोलंबो : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना कोलंबो येथे सुरू आहे. या सामन्यात तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला आहे. तिसऱ्या दिवसअखेर श्रीलंका २३८ धावांनी पिछाडीवर आहे. नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेणाऱ्या भारताने नऊ बाद ५०३ या धावसंख्येवर डाव घोषीत केला. नंतर फलंदाजीसाठी आलेल्या श्रीलंकेने पहिल्या डावात तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत आठ बाद २६५ धावा केल्या आहेत. लाहिरू कुमार आठ धावांवर आणि सोनल दिनुशा ८५ धावांवर खेळत आहे.

भारताकडून प्रसिद्ध कृष्णा आणि मानव सुथार या दोघांनी प्रत्येकी तीन विकेट घेतल्यामुळे सामन्यातील भारताची बाजू वरचढ झाली आहे. रविंद्र जडेजा आणि मोहम्मद सिराजने प्रत्येकी एक विकेट घेतली आहे. श्रीलंकेकडून लाहिरू उदाराने एक धाव, कामिल मिश्राने १९ धावा, प्रभात जयसूर्याने दोन धावा, पसिंदू सूरियाबंदाराने ८० धावा, कामिंदू मेंडिसने ३२ धावा, धनंजय डी सिल्वाने आठ धावा, निरोशन डिकवेलाने शून्य धावा, केशरा नुवान्थाने १८ धावा एवढे योगदान दिले आहे.

दिनुशाने भारताविरुद्धच्या या कसोटी मालिकेतले तिसरे अर्धशतक झळकावले. तो सध्या चांगली कामगिरी करताना दिसत आहे. आता दिनुशा तळाच्या फलंदाजांसोबत किती वेळ खेळतो यावर श्रीलंका केवढी मजल मारणार हे स्पष्ट होणार आहे.

दिनुशाव्यतिरिक्त श्रीलंकेकडून पसिंदू सूरियाबंदारा हा एकच खेळाडू भारतीय गोलंदाजांसमोर उभा राहू शकला. इतर फलंदाजांना जास्त काळ टिकणे जमले नाही. यामुळे भारताला लंकेवर दबाव वाढवणे सोपे झाले. भारताने श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना जिंकला आहे. गॉल येथे झालेला हा सामना भारताने १६५ धावांनी जिंकला. आता कोलंबो कसोटीतही सध्या भारताची स्थिती उत्तम दिसत आहे. जर कोलंबोत विजय झाला, तर भारत मालिका २-० अशी जिंकणार आहे.

# एरोबिक्स व हिप-हॉप स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे यश




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अहिल्यानगर स्पोर्ट्स एरोबिक्स अँड फिटनेस असोसिएशनच्या वतीने राहाता क्रीडा संकुल, शिर्डी येथे २१वी फहम महाराष्ट्र राज्य एरोबिक्स व हिप-हॉप अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात पार पडली. या राज्यस्तरीय स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी यश प्राप्त केले आहे.

इयत्ता अकरावी 'एफ'मधील सिया पाटील हिने १७ वर्षांखालील हिप-हॉप स्पर्धेत सुवर्णपदक आणि एरोबिक्स स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. त्याचप्रमाणे इयत्ता सातवी 'सी'मधील काव्या पटेल हिने १४ वर्षांखालील एरोबिक्स स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. या दमदार कामगिरीबद्दल सिया आणि काव्या यांची सन २०२६-२७मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील एरोबिक्स व हिप-हॉप अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

दोन्ही विद्यार्थिनींच्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका राज आलोनी यांनी अभिनंदन व कौतुक केले. सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.



# मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत उरणच्या खेळाडूंची चमक

**उरण : बातमीदार**

मिक्स बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने सातवी जिल्हास्तरीय मिक्स बॉक्सिंग स्पर्धा अलिबाग येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून अनेक संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेत उरणमधील विजय विकास सामाजिक संस्थेच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई केली.

सुवर्णपदक पटकावणाऱ्या खेळाडूंमध्ये आसिफ खान, शिवांश सिंग, रेयांश पाटील, मेहबूब खान, श्लोक पाटील, झारा पटेल, जागृती घरत, सोहेल पटेल, नियान ठाकूर, हर्नल पाटील, जीत घरत, प्रीत घरत, ऋत्विक ठाकूर, प्रभास राजन्या आणि भक्ती भोईर यांचा समावेश आहे. चैतन्य स्वर, आयुष घरत, युग घरत, कुशल म्हात्रे आणि आशुतोष शेट्टी यांनी रौप्यपदक पटकावले, तर एस.आर. विधू आणि मुस्कान खान यांनी कांस्यपदक मिळवले.

या सर्व खेळाडूंना विकास भोईर, दीपक घरत, प्रगती भोईर घरत आणि अथर्व घरत यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले. या यशाबद्दल सर्व विजेत्या खेळाडूंचे आणि प्रशिक्षकांचे अभिनंदन होत आहे.

## नाईट क्लब राड्यानंतर इंग्लंड संघातून खेळाडू आऊट

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडमध्ये नाईट क्लबमधील वाद काही नवे नाहीत. अनेक क्रिकेटपटू नाईट



क्लबमध्ये जाऊन वादात अडकले आहेत. त्यात आता वेगवान गोलंदाज ब्रायडन कार्स याच्या नव्या प्रकरणाची भर पडली आहे. डर्बी येथील मॉली मालोन टेव्हर्न नाईट क्लबमधून पोलिसांनी कार्स याला बेड्या घालून ताब्यात घेतले. यानंतर इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्डाने (ईसीबी) त्याला संघाबाहेर काढण्याचा निर्णय घेतला आहे.

कार्सला पाकिस्तानविरुद्ध होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यातून बाहेर करण्यात आले आहे. या सामन्यासाठी तो निवडीसाठी उपलब्ध राहणार नाही, अशी पुष्टी करण्यात आली आहे. शनिवारी रात्री पोलिसांनी त्याला नाईट क्लबमधून अटक केली होती. या प्रकरणी ईसीबीने चौकशीही सुरू केली आहे तसेच कार्स याच्या जागी सोनी बेकर यांचा संघात समावेश करण्यात आला आहे.

# वैभव सूर्यवंशीने जर्सीवर टेप लावून नंबर लपवला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटमधील युवा स्टार वैभव सूर्यवंशी सध्या दुलीप ट्रॉफीतील पदार्पणामुळे चर्चेत आहे. अवघ्या १५ वर्षांच्या वैभवने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यानंतर आता देशांतर्गत क्रिकेटमध्येही पाऊल ठेवले आहे. दुलीप ट्रॉफीमध्ये तो ईस्ट झोनचा उपकर्णधार आहे, मात्र दुलीप ट्रॉफीतील पहिल्याच सामन्यात त्याला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. अशातच त्याच्या फलंदाजीपेक्षा जर्सीवरील नंबरने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

वैभव सूर्यवंशी मैदानात उतरला तेव्हा त्याच्या जर्सीवर एक नंबर टेपने झाकलेला दिसला. त्याची जर्सी मूळतः १३ नंबरची होती, मात्र वैभवने १ हा अंक टेपने झाकून जर्सीचा नंबर ३ असा केला होता. हा प्रकार पाहून क्रिकेट चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली. वैभवने १३ नंबर का लपवला आणि त्याला ३ नंबरच का हवा आहे, असा प्रश्न उपस्थित झाला.

### चाहतेही चक्रावले



वैभव सूर्यवंशी आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळतानादेखील ३ नंबरची जर्सी परिधान करताना दिसला होता. त्यामुळे ३ हा नंबर त्याच्यासाठी विशेष असल्याचे स्पष्ट होते. दुलीप ट्रॉफीमध्येही त्याला ३ नंबरची जर्सीच हवी होती, मात्र त्याला या नंबरची जर्सी उपलब्ध न झाल्याने त्याने मिळालेल्या १३ नंबरच्या जर्सीवरील १ हा अंक टेपने झाकून टाकला आणि ३ नंबरची जर्सी तयार केली.

वैभवच्या जर्सी नंबरमागे त्याच्या आईचा सल्लाही असल्याचे समोर आले आहे. अंकशास्त्रानुसार ३ हा नंबर शुभ असल्याचं मानून वैभवच्या आईने त्याला हा नंबर वापरण्याचा सल्ला दिला होता. वैभवच्या आईने त्याला १ आणि २ मिळून ३ होतात, त्यामुळे १२ नंबरची जर्सी घालण्यापेक्षा ३ नंबरची जर्सी निवडावी, असे सांगितल्याचे वृत्त आहे. त्यानंतर वैभवने ३ नंबरला विशेष महत्त्व दिले.

**फलंदाजीत प्लॉप, गोलंदाजीत चमकला!**

वैभव सूर्यवंशी हा त्याच्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो. दुलीप करंडक स्पर्धेत उपकर्णधारपदाच्या जबाबदारीसह ईस्ट झोन संघाकडून त्याला फलंदाजीतील धमक दाखवा आली नाही. पहिल्या डावात तो अवघ्या सहा चेंडूत आठ धावांवर बाद झाला, पण नॉर्थ ईस्ट झोन विरुद्धच्या सामन्यात वंडर बॉय वैभवने अवघ्या चार चेंडूंमध्ये दोन विकेट घेत खळबळ उडवून दिली. त्यामुळे आता वैभग हा फक्त फलंदाज उरलेला नाही आता तो अष्टपैलू खेळाडू म्हणून डेव्हलप होताना दिसत आहे.

## सर्फराजने चिडवले अन् लंकेचा कर्णधार बाद झाला

**कोलंबो : वृत्तसंस्था**

कोलंबो कसोटीत भारताने पहिल्या डावात ९ बाद ५०३ धावा उभारल्यानंतर श्रीलंकेचा निम्मा संघ स्वस्तात माघारी परतला. शॉर्ट लेगवर उभ्या असलेल्या सर्फराज खानने श्रीलंकन कर्णधार धनंजय डी सिल्वाला डिवचले आणि पुढच्याच षटकात मानव सुथारच्या फिरकीवर केएल राहुलने झेल घेत त्याला बाद केले.

श्रीलंकेची पहिल्या डावातील फलंदाजी सुरू असताना कर्णधार धनंजय डी सिल्वा स्ट्राईकवर होता. त्यावेळी शॉर्ट लेगला क्षेत्ररक्षण करत असलेला सर्फराज हा सिल्वाला डिवचताना दिसून आला. त्यावेळी सिराज त्याला, "तू कॅप्टन आहेस ना?", त्याचा हा प्रयत्न यशस्वी ठरला. भारतीय संघाकडून ३५वे षटक टाकण्यासाठी मानव सुथार गोलंदाजीला आला. या षटकातील पहिल्याच चेंडूवर चेंडू बॅटची कडा घेऊन स्लीपमध्ये गेला होता. झेल हाती येण्याआधी चेंडू थोडा पुढे पडला. त्यामुळे तो थोडक्यात बचावला. त्यानंतर पुढचाच चेंडू त्याच्या पॅडला जाऊन लागला. इथेही तो बचावला, पण षटकातील पाचव्या चेंडूवर तो झेलबाद होऊन परतला.

# आरडीसीएतर्फे उरण येथे क्रिकेट पंच परीक्षा



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) वतीने नुकतेच उरण येथील माऊली कृपा हॉलमध्ये जिल्हास्तरीय क्रिकेट पंच परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी जिल्ह्यातील २० पंचांनी सहभाग घेतला.

सकाळच्या सत्रात परीक्षार्थी पंचांना प्रॅक्टिकल ट्रेनिंग देण्यात आले व त्यानंतर दुपाऱ्या सत्रात परीक्षा घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. आरडीसीएतर्फे सातत्याने जिल्ह्यातील क्रिकेट पंचांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येत असते. हे प्रशिक्षण शिबिर ऑनलाईन व प्रत्यक्ष कार्यशाळेच्या माध्यमातून घेण्यात आले असून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) वतीने आयोजित पंच परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी उपयुक्त ठरले आहे.

नुकत्याच एमसीएतर्फे घेण्यात आलेल्या पंचांच्या लेखी परीक्षेत रायगड जिल्ह्यातील आठ पंच उत्तीर्ण होऊन अंतिम प्रॅक्टिकल परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये अॅड.देवेंद्र मिश्रा, अभिजित वाडकर, निशांत माळी, सुरेश म्हात्रे, प्रणव सामंत, राहुल पाटील, रवींद्र म्हात्रे, यश संकपाळ यांचा समावेश आहे.

रायगडातील सर्व पंचांना प्रशिक्षण शिबिरासाठी मुख्य प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टा, माजी रणजीपटू व विद्यमान बीसीसीआयचे पंच हर्षद रावले, रूपेश खडगी, एमसीएचे पंच राजन कसबे यांनी योगदान दिले आहे.

प्रशिक्षण शिबिरासाठी डी.के भोईर यांनी आपला माऊली कृपा हॉल विनामूल्य दिल्याबद्दल त्यांचे आरडीसीएच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले तसेच उत्तीर्ण झालेल्या सर्व पंचांना आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# कार्तिक त्यागीने टाकला सुपरफास्ट चेंडू

**लखनऊ : वृत्तसंस्था**



भारताचा युवा वेगवान गोलंदाज कार्तिक त्यागीने यूपी टी-२० लीगमध्ये आपल्या वेगवान गोलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मेरठ मॅव्हेरिक्स आणि गोरखपूर लायन्स यांच्यात झालेल्या सामन्यात कार्तिकने ताशी १५३.६ किलोमीटर वेगाने सुसाट चेंडू फेकत विरोधी फलंदाजाला तंबूचा रस्ता दाखवला.

सामन्यादरम्यान गोरखपूर लायन्सचा फलंदाज प्रिन्स यादव फलंदाजी करत असताना कार्तिकने ताशी १५३.६ किमी वेगाने चेंडू टाकला. चेंडूचा प्रचंड वेग पाहता फलंदाजाला फटका मारण्यासाठी खूपच उशीर झाला. लेग साईडला फटका मारण्याच्या प्रयत्नात चेंडू बॅटची कडा घेऊन मिड-ऑफला उभ्या असलेल्या रिंकू सिंगच्या हातात गेला आणि प्रिन्स यादव बाद झाला. याआधीच्या एका सामन्यात कार्तिकने आपल्या यॉर्कर चेंडूवर थेट स्टंप तोडला होता.

भारताच्या २०२० अंडर-१९ विश्वचषक संघाचा भाग राहिलेला कार्तिक त्यागी भारतीय संघाचा नेट बॉलर म्हणूनही राहिला आहे. आयपीएल २०२६मध्ये तो कोलकाता नाइट रायडर्स संघाकडून खेळला होता, जिथे त्याने १४ सामन्यांत १८ बळी घेत आपल्या वेगाचा ठसा उमटवला होता.

**मेरठ संघ विजयी**

पावसाच्या व्यत्ययामुळे हा सामना प्रत्येकी आठ षटकांचा करण्यात आला होता. प्रथम फलंदाजी करताना गोरखपूर लायन्सने आठ षटकांत सहा बाद ९१ धावा केल्या. प्रत्युत्तरात मेरठ मॅव्हेरिक्सने अवघ्या ६.४ षटकांत एकही गडी न गमावता हे आव्हान सहज पूर्ण केले. मेरठचा कर्णधार रिंकू सिंगने अवघ्या सात चेंडूंत दोन चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने २९ धावांची वादळी खेळी केली, तर सलामीवीर स्वास्तिक चिकाराने २४ चेंडूंत ४४ धावा करत संघाला १० गडी राखून दणदणीत विजय मिळवून दिला.

# सूर्याने 'त्या' एका फोटोसाठी रोहित-धोनीची केली होती मनधरणी



**मुंबई : प्रतिनिधी**

तीन पिढ्या, तीन कर्णधार आणि एकच फ्रेम भारतीय टी-२० क्रिकेटचा हा ऐतिहासिक प्रवास एका फोटोमध्ये पाहायला मिळाला. आयपीएल २०२६दरम्यान सराव सत्रात महेंद्रसिंह धोनी, रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव एकत्र दिसले होते. सूर्यकुमारने त्याच्या इन्स्टाग्रामवर हा खास फोटो शेअर केला होता, पण हा फोटो काढण्यासाठी सूर्याने या दोन्ही दिग्गजांना कसे तयार केले याचा खुलासा त्याने स्वतः केला आहे.

धोनी, रोहित व सूर्याचा हा फोटो खूपच खास आहे, कारण या तिन्ही खेळाडूंच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने टी-२० विश्वचषक जिंकला आहे. हे तिघेही वेगवेगळ्या पिढ्यांमध्ये भारताला टी-२० वर्ल्डकप जिंकून देणारे कर्णधार आहेत. धोनीने २००७मध्ये भारताला पहिल्यांदा टी-२० वर्ल्डकप जिंकून दिला. त्यानंतर रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने २०२४मध्ये पुन्हा टी-२० विश्वचषकावर नाव कोरले, तर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारताने २०२६मध्ये तिसऱ्यांदा ही ट्रॉफी जिंकली.

'बैठ अँड बोल विथ आकाश चोप्रा' या पोडकास्टमध्ये सूर्यकुमार यादवने या फोटोबद्दल सांगितले आहे. सूर्याला आकाश चोप्राने या फोटोबद्दल विचारताच सूर्या म्हणाला, हा माझा फेव्हरेट फोटो आहे. आम्ही तेव्हा चेन्नईत होतो आणि सराव करत होतो.

## ध्रुव जुरेलच्या टॅटूमध्ये हृदयस्पर्शी कहाणी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ध्रुव जुरेलने नाबाद ११५ धावांची शानदार खेळी केली. त्याच्या शतकाइतकीच सेलिब्रेशनचीही चर्चा रंगली. शतक पूर्ण होताच त्याने प्रथम सलाम केला आणि त्यानंतर बायसेप्सवर असलेला 'जय जवान, जय किसान' हा टॅटू दाखवला. या खास सेलिब्रेशनमागे त्याच्या वडिलांशी आणि आजोबांशी जोडलेली भावुक कहाणी आहे.

शतकानंतर केलेला सलाम आणि टॅटू दाखवण्यामागचे कारण स्वतः ध्रुव जुरेलने सांगितले. त्याचे आजोबा शेतकरी होते, तर वडिलांनी भारतीय सैन्यात सेवा बजावली आहे. त्यामुळेच त्याने आपल्या शरीरावर 'जय जवान, जय किसान' ही घोषणा टॅटूच्या स्वरूपात कोरून घेतली आहे.

जुरेल म्हणाला की, माझे आजोबा शेतकरी होते आणि माझे वडील सैनिक होते. हीच माझी ओळख आहे. मी त्यांना कधीही विसरू शकत नाही. त्यामुळे शतकानंतरचा तो सलाम माझ्या वडिलांसाठी आणि आजोबांसाठी होता.

# दुलिप ट्रॉफी : ईस्ट झोनची सेमी फायनलमध्ये धडक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

दुलीप करंडक स्पर्धेत बंगळुरूमधील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्सच्या मैदानावर रंगलेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत ईशान किशनच्या नेतृत्वाखालील ईस्ट झोन संघाने एक डाव आणि २१० धावांनी विजय मिळवत उपांत्य फेरीत धडक मारली आहे. पहिल्या डावात १११ धावांत ऑलआऊट झाल्यानंतर फॉलोऑनची नामुष्की ओढावलेल्या नॉर्थ ईस्ट झोनचा संघ दुसऱ्या डावात १४६ धावांत गारद झाला.

ईस्ट झोनकडून टीम इंडियाचा स्टार मोहम्मद शमीने दोन्ही डावांत मिळून १४ षटके गोलंदाजी केली, मात्र त्याला एकही विकेट मिळवता आली नाही. दुसरीकडे फलंदाजीत फ्लॉप ठरलेल्या वैभव सूर्यवंशीने गोलंदाजीत कमाल करत तीन षटकांत दोन विकेट्स घेतल्या.

ईशान किशनच्या ईस्ट झोनविरुद्धच्या सामन्यात नॉर्थ ईस्ट झोनचा कर्णधार रोंगसेन जोनाथनने याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचा हा निर्णय फोल ठरला. प्रथम फलंदाजी करताना ईस्ट झोनने ४६७ धावा केल्या. यात शहबाज अहमदने १६७, तर सुदीप कुमार घरामीने १४६ धावांची खेळी केली. वैभव सूर्यवंशी आणि ईशान किशन मात्र फलंदाजीत अपयशी ठरले. आकाश चौधरी आणि फेरोईजम जोटिन यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या.

यानंतर फलंदाजीला उतरलेला नॉर्थ ईस्ट झोनचा संघ १११ धावांवर गारद झाला. त्यामुळे ३५०हून अधिक धावांची आघाडी मिळाल्यानंतर ईस्ट झोनने त्यांना फॉलोऑन दिला. फॉलोऑननंतर दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा नॉर्थ ईस्ट झोनने बिनबाद सात धावा केल्या होत्या. तिसऱ्या दिवशी नॉर्थ ईस्ट झोनचा डाव १४६ धावांत आटोपला.

ईस्ट झोनकडून दुसऱ्या डावात अनुकूल रॉयने सर्वाधिक पाच विकेट्स घेतल्या. वैभव सूर्यवंशी याने तीन षटकांत ११ धावा खर्च करताना दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय मुकेश कुमार आणि अभिषेजित सरकार यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com